www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ वाहतूक कोंडी टाळण्यासाठी डोंबिवली पश्चिमेतील गुप्ते,....

पान ३ वर....


दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ




■ सर्प व विंचू दंशाने होणारे मृत्यु शून्यावर आणण्यासाठी...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १७७ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार,२७ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## सध्या राज्याचे एकनाथ शिंदे काळजीवाहू मुख्यमंत्री!

## लवकरच भाजपच्या निरीक्षकांकडून होणार सर्वे..

● मुंबई, यश सावंत :

**भाजपचा दोन दिवसात नेता निवडीचा निर्णय होणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. भाजपचे दोन निरीक्षक नेता निवडीसाठी महाराष्ट्रात येणार आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.**

भाजपच्या नेता निवडीची बैठक ही २९ तारखेला होणार आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. विशेष म्हणजे एकनाथ शिंदे, अजित पवार आणि भाजप यांची खातीदेखील ठरली आहेत, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. नवं सरकार स्थापन होईपर्यंत आणि नव्या मुख्यमंत्र्यांनी शपथ घेईपर्यंत ते राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री राहणार आहेत.



राज्यात पुढच्या दोन दिवसात केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह भाजपचे २ निरीक्षक महाराष्ट्रात येणार आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार यावर शिक्कोर्तब झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. फडणवीसांच्या मुख्यमंत्रीपदाला भाजपच्या सर्व आमदारांचा पाठिंबा आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खातं जाणार आहे. अजित पवार यांच्याकडे अर्थ खातं जाणार आहे. तर देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह मंत्रालय राहणार आहे.

भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी प्रतिक्रिया दिली. "ही चांगली गोष्ट आहे. जेव्हाही नेत्याची निवड होते तेव्हा पक्षाची बैठक घेऊन, नेता निवडीचा जो नियम असतो त्या नियमाचं पालन करावं लागतं. प्रत्येक ठिकाणी तसंच होतं.

पान २ वर

## सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएम हटवण्याची जनहित याचिका फेटाळली

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

भारतातील निवडणुका मतपत्रिकांवर घेण्याची मागणी मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळून लावली. यावेळी याचिकाकर्त्याने आपल्या याचिकेत असे नमूद केले होते की, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री वायएस जगन मोहन रेड्डी यांसारख्या नेत्यांनी ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. यावर उत्तर देताना खंडपीठ म्हणाले, "जेव्हा चंद्राबाबू नायडू किंवा जगन मोहन रेड्डी जिंकतात तेव्हा ते काहीही बोलत नाही पण हरले की म्हणतात, ईव्हीएममध्ये छेडछाड झाली आहे."न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती पीबी वराळे यांच्या खंडपीठाने केए पॉल यांनी दाखल केलेली जनहित याचिका फेटाळून लावली.



केए पॉल त्यांच्या याचिकेत म्हणाले होते की, "ईव्हीएममध्ये छेडछाड केली जाऊ शकते आणि भारताने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राऐवजी कागदी मतपत्रिका वापरण्याची पद्धत पाळली पाहिजे. ईव्हीएम लोकशाहीला धोका आहे. टेस्ला आणि स्पेसएक्सचे सीईओ एलोन मस्क यांसारख्या व्यक्तींनी ईव्हीएम छेडछाडीच्या मुद्द्यावर चिंता व्यक्त केली होती."

पान २ वर

## मुंबई-गोवा महामार्गावर धुळीचे साम्राज्य; वाहनचालकांसह नागरिकांना होतोय त्रास

● रायगड, धनश्री सट्टा :

मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणाचे काम १७ वर्षांपासून सुरू आहे. गणेशोत्सवानंतर या महामार्गाचे काम शीघ्रगतीने सुरू असले तरी या कामात कोणतेही नियोजन दिसून येत नाही. मुंबई-गोवा महामार्गावर कोलाडपासून खांबपर्यंत रस्ता काँक्रीटीकरण, उड्डाण पूल, छोटे- मोठे ब्रिज, गटाराचे काम विविध ठिकाणी सुरू आहे. असे असताना हे काम डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण होईल, याची खात्री देता येत नसल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे.



मुंबई-गोवा महामार्गाचे काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. या कामामुळे महामार्गावर सध्या धुळीचे साम्राज्य पसरले आहे. कोलाड बाजारपेठ ते तळवली गावापर्यंत अनेक ठिकाणी काम सुरू असल्याने या धुळीमुळे वाहनचालकांसह नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यानंतर या मार्गावर पर्यटकांच्या वाहनाची वर्दळ वाढणार आहे, यामुळे रस्त्यांवरील धुरळा आणखी वाढण्याची शक्यता आहे. धुळीचा त्रास होऊ नये म्हणून पाण्याची फवारणी केली जात आहे. या फवारणीमुळे मात्र रस्त्यावर चिखल निर्माण झाला आहे. या चिखलातून मार्ग काढताना दुचाकी वाहने घसरून अपघाताच्या घटना वाढल्या आहेत. या महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे दररोज अपघात होऊन असंख्य प्रवाशांचा नाहक बळी जात आहे. शिवाय रस्त्यावर धूळ असल्यामुळे वाहनचालकांसह नागरिकांना याचा त्रास होत आहे. दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गाचे काम मागील अनेक वर्षांपासून रखडले आहे. त्यामुळे सातत्याने आरोप-प्रत्यारोप होत आहेत.

## पराभवानंतर अमित ठाकरे लागले कामाला, नव्या सरकारला दिला इशारा

● मुंबई, सचिन कदम :

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार आणि राज ठाकरेंचे पुत्र अमित ठाकरे यांचा माहीममध्ये पराभव झाला आहे. सदा सरवणकर यांनी माहीममधून माघार न घेतल्याने ही निवडणूक चर्चेत आली होती. यानंतर जो निकाल समोर आला त्यात अमित ठाकरेंचा पराभव झाला आहे. असून नव्या सरकारला इशार दिला आहे.

सायन कोळीवाड्यातील पंजाब कॉलनीत सोमवारी रात्री घडलेल्या एका भयंकर घटनेनं संपूर्ण मुंबई हादरली आहे. तीन वर्षांच्या चिमुकलीवर ड्रग्सच्या नशेत असलेल्या नराधम अनिल गुप्ताने अमानुष अत्याचार केला. आज ती चिमुकली सायन रुग्णालयात जीवनमरणाच्या झुंजीत आहे. हा केवळ एका चिमुकलीवर नाही, तर आपल्या समाजाच्या संवेदनांवर झालेला आघात आहे. मुंबईसह इतर शहरांमध्ये दिवसेंदिवस ड्रग्सचं प्रमाण वाढतं आहे, अनेक घरं उद्ध्वस्त होत आहेत. महिलांच्या आणि मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. दादर, सायनसारख्या भागातही ड्रग्सच्या विळख्यात गर्दुल्यांची संख्या वाढली असून महिलांनी याबाबत माझ्याकडे अनेकदा तक्रारी केल्या आहेत.



मनसेनं सुरुवातीपासूनच अशा नराधमांवर कठोर कारवाईसाठी भूमिका घेतली आहे. म्हणूनच माझ्या वचननाम्यात मी ड्रग्स विक्री, सेवन करणाऱ्यांवर कठोर उपाययोजना करण्याचं वचन दिलं होतं आणि आज त्या दिशेनं पाऊलं टाकत आहे. सायनमधील या नराधमाला अटक झाली असली, तरी फक्त अटक पुरेशी नाही. काही महिन्यांपूर्वी सायन रुग्णालयात महिला डॉक्टरवर मद्यधुंद पेशंटने अतिप्रसंग केल्याची घटना समोर आली होती. या सगळ्याचा तपास जलदगतीने आणि प्रभावी पद्धतीने पूर्ण झालाच पाहिजे. आरोपीला न्यायालयीन प्रक्रियेतून कडक शिक्षा झालीच पाहिजे. जर या प्रकरणात ठोस कारवाई झाली नाही, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना अशा नराधमांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय शांत बसणार नाही! हे फक्त शब्द नाहीत, तर इशारा आहे. मुलींच्या सुरक्षिततेसाठी, ड्रग्समुक्त महाराष्ट्रासाठी मनसेचा संकल्प आहे.

## महाराष्ट्राच्या उपराजधानीत नव्या सरकारच्या पहिल्या हिवाळी अधिवेशनासाठी जोरात तयारी सुरू

● नागपुर, नितीन देवळेकर :



नव्या सरकारचे पहिले हिवाळी अधिवेशन डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात महाराष्ट्राची उपराजधानी नागपुरात होणार आहे. उपराजधानीत नव्या सरकारचे स्वागत सुरू झाले आहे. विधानभवन, रविभवन, नागभवन, आमदार निवास आदी ठिकाणी साफसफाई, रंगकाम, फर्निचरची दुरुस्ती, नूतनीकरण आदी कामे जोरात सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार मंत्र्यांच्या बंगल्याबाहेर पंडाल उभारण्यासाठी बांबूच्या काठ्या बांधण्याचे कामही वेगाने सुरू आहे. निवडणुका पार पाडल्यानंतर आता संपूर्ण सरकारी कर्मचारी हिवाळी अधिवेशनाच्या तयारीत व्यस्त आहे. सरकार स्थापन झाल्यानंतर मुंबईतूनही कर्मचारी स्टॉक घेण्यासाठी येणार आहे. सध्या सिव्हिल लाईन्स परिसरात तयारी दिसून येत आहे. रस्त्यांची डागडुजी, भिंती रंगवण्याचे कामही सुरू आहे.

पान २ वर

## जिल्ह्यातील ३०३ उमेदवारांना निवडणूक खर्चाचा अंतिम हिशेब देण्यासाठी २३ डिसेंबरपर्यंतची मुदत

● पुणे, अभिजित येरल्लू :

जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढविणाऱ्या सर्व ३०३ उमेदवारांना निवडणूक खर्चाचा अंतिम हिशेब देण्यासाठी २३ डिसेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत सर्व उमेदवारांना निवडणूक खर्चाची तपशील निवडणूक शाखेकडे जमा करावा लागणार आहे. संबंधित उमेदवारांकडून पुढील आठवड्यापासून खर्चाचा तपशील जमा होण्यास सुरुवात होईल. त्यात काही तफावत आढळल्यास त्याबाबत नोटीस पाठवून खुलासा मागविला जाईल. खुलासा समाधानकारक असल्यास संबंधित उमेदवाराचा खर्चाचा अहवाल निवडणूक आयोगाला पाठविण्यात येईल, असे जिल्हा निवडणूक शाखेकडून सांगण्यात आले.

विधानसभा निवडणुकीसाठी ४० लाख रुपयांच्या खर्चाची मर्यादा होती. अर्ज भरल्याच्या दिवसापासून निवडणुकीदरम्यान सर्व उमेदवारांना टप्प्याटप्प्याने खर्चाचे हिशोब द्यावे लागत होते. उमेदवारांनी दिलेल्या खर्चाचे हिशोब निवडणूक खर्च निरीक्षकांकडे आल्यानंतर त्यांच्याकडून तपासणी करण्यात येते. त्या तपासणीमध्ये प्रशासनाकडील खर्चानुसार, उमेदवाराच्या खर्चात काही फरक आढळल्यास त्याबाबत उमेदवाराकडे विचारणा केली जाते. त्याबाबत नोटीस जारी केली जाते. त्यासंदर्भात उमेदवाराने खुलासा दिल्यास तो समाधानकारक असल्यास त्यांची बाजू ग्राह्य धरली जाते. खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांच्याकडे पुन्हा विचारणा होण्याची शक्यता असते. तसेच त्या उमेदवारालाही जिल्हा समितीकडे दाद मागता येते.

निवडणुकीदरम्यान उमेदवारांच्या खर्चाची तीन टप्प्यांत तपासणी करण्यात आली होती. त्यात अनेकांचे खर्चाचे हिशोब जुळत नव्हते. उमेदवारांकडे विचारणाही करण्यात आली होती. खर्चाच्या तफावतीबाबत अनेक उमेदवारांनी संबंधित निवडणूक खर्च निरीक्षकांकडे खुलासेही दिले आहेत. मात्र, आता निवडणुका पार पडल्या आहेत. निकालही जाहीर झाले आहे. त्यामुळे निवडणुकीच्या खर्चाचा अंतिम हिशेब देणे सर्व उमेदवारांना बंधनकारक आहे.

## बिनविरोध मतदारसंघ शिंदेंच धेय्य !

● ठाणे, विशाल पाटील :



राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या वागळे इस्टेट भागातून पाचवेळा काँग्रेस पक्षातून नगरसेवक म्हणून निवडून आलेले आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्याविरोधात दोनदा विधानसभेची निवडणूक लढलेले मनोज शिंदे यांनी नुकताच शिंदेच्या शिवसेनेत पक्ष प्रवेश केला आहे. यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांचे कट्टर विरोधक असलेले मनोज शिंदे हे त्यांचे कट्टर समर्थक कसे बनले, याविषयी आता वेगवेगळ्या चर्चा रंगल्या असून काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी कोकण विभागाकडे केलेल्या दुर्लक्षितपणामुळेच हा निर्णय घेतल्याचे खुद्द मनोज यांनी स्पष्ट केले आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या जागा वाटपात भिवंडीची हक्काची जागा काँग्रेसने राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाला दिली. यानंतर विधानसभा निवडणुकीतही कोकण पट्टयात महाविकास आघाडीमुळे काँग्रेस पक्षाला हक्काच्या जागा सोडाव्या लागल्या.

पान २ वर

## रेल्वे रुळाखालील भुयारी मार्गाचा स्लॅब तुटलेला असताना देखील बदलापूरकरांचा जीवघेणा प्रवास

● बदलापूर, आकाश कांबळे :

बदलापूरमधील नागरिक जीवघेणा प्रवास करत असल्याचे चित्र समोर आले आहे. बदलापूरमधील रेल्वे रुळाखालील भुयारी मार्गाचा स्लॅब तुटला आहे. त्यामुळे या ठिकाणी कधीही मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे. असे असताना देखील याकडे रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. याठिकाणावरून बदलापूरकर दुचाकी, रिक्षा आणि कारमधून प्रवास करत आहेत.

बदलापूर रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे रुळाखालील भुयारी मार्गाच्या स्लॅबचा काही भाग तुटलाय. त्यातून या स्लॅबमध्ये वापरण्यात आलेल्या लोखंडी सळया म्हणजेच गज बाहेर दिसू लागले आहेत. पावसाळयात अनेकदा त्या



स्लॅबमधून पाणी गळती होते. या भुयारी मार्गातून पूर्व आणि पश्चिमेकडे येण्या जाण्याचा मार्ग आहे.

शिवाय या भुयारी मार्गावर असलेल्या रेल्वे रुळांवरुन काही मिनिटांच्या अंतराने अनेक लोकल आणि लांब पल्ल्याच्या गाड्या धावत असतात. यामुळे भुयारी मार्ग कमकुवत होण्याची शक्यता आहे. या भुयारी मार्गाच्या दुरुस्तीकडे रेल्वे प्रशासनाने लक्ष दिलं नाही तर एखादी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## गृह मंत्रालयाकडून रश्मी शुक्ला यांची पुन्हा महाराष्ट्राच्या पोलिस महासंचालकपदी नियुक्ती !

● मुंबई, विशाल कारंडे :

**भारतीय पोलिस सेवेतील अधिकारी रश्मी शुक्ला यांची महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकपदी (डीजीपी) पुन्हा नियुक्ती करण्यात आली आहे. ४ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी भारतीय निवडणूक आयोगाने त्यांची बदली केली होती.**

निवडणूक समितीने मुख्य सचिवांना संवर्गातील पुढील सर्वात वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याकडे पदभार सोपवण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, रश्मी शुक्ला यांच्या जागी संजय कुमार वर्मा यांच्याकडे डीजीपीचा पदभार सोपवण्यात आला होता.

रश्मी शुक्ला यांची महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या पदावरून तात्पुरती बदली करण्यात आली होती. रश्मी शुक्ला, 1988 च्या बॅचच्या IPS अधिकारी, महाराष्ट्राच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक आहेत. रश्मी शुक्ला यांचे पुनरागमन निश्चित मानले गेले होते. यापूर्वी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने राज्य गुप्तचर विभागाचे आयुक्त म्हणूनही काम पाहिले आहे. महाराष्ट्र पोलिसांच्या सर्वात वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांपैकी त्या एक आहेत. त्यांनी सशस्त्र सीमा बल (SSB) चे केंद्रप्रमुख म्हणूनही काम केले. याशिवाय त्यांनी पुण्याचे पोलीस आयुक्त म्हणूनही काम पाहिले आहे.



## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# नव्या मराठी सेनेची गरज

मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी ज्या पक्षाची स्थापना झाली त्या नेत्यांची भव्यदिव्य निवासस्थाने बनत असताना बहुसंख्य मराठी माणूस मुंबईबाहेर फेकला जात आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी जो मोठा लढा देण्यात आला त्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली होती, पण पुढे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर तिचा फार काळ टिकाव लागला नाही.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर भाजपचे प्रमुखत्व असलेल्या महायुतीला जे प्रचंड यश मिळाले ते पाहिल्यानंतर आता आगामी काळात महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये आपले काय होणार याविषयी विरोधी पक्षांच्या नेत्यांना चिंता वाटल्याशिवाय राहणार नाही. कारण एकूणच वातावरण तसेच आहे. मुंबईतील मराठी माणसाचा टक्का कमी होत चालला आहे, हे अलीकडच्या काळात दिसून येत आहे.

महाराष्ट्राची सत्ता ज्यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला विरोध केला होता किंवा त्या काळात निष्क्रिय राहिले होते त्या काँग्रेस पक्षाकडे गेली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. त्यात महाराष्ट्रातील अनेक बुद्धिजीवींचे मोठे योगदान आहे. ते रस्त्यावर उतरले, त्यांनी जनमत संघटित केले. त्यातून ती चळवळ उभी राहिली. काँग्रेसचे मोरारजी देसाई त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी त्यांच्या आदेशाने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणाऱ्या आंदोलकांवर गोळीबार करण्यात आला.त्यात १०६ आंदोलक शहीद झाले. इतके सगळे होऊनही संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर विशेषत: मुंबईमध्ये महाराष्ट्राचा भूमिपुत्र असलेला मराठी माणूस त्याच्या न्याय हक्कापासून वंचित राहत होता. काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असल्यामुळे त्यांना भूमिपुत्रांच्या प्रश्नांची फारशी चिंता नव्हती. अशा परिस्थितीत सामान्य मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबईत शिवसेनेची स्थापना केली.

शिवसेनेच्या नेतृत्वाखाली मुंबईत मराठी माणसाला त्याचे विविध क्षेत्रांमध्ये हक्क मिळावेत म्हणून अनेक आंदोलने करण्यात आली. त्यातून मुंबईतील मराठी लोकांना अनेक उद्योगांमध्ये, कंपन्यांमध्ये, बँका, हॉटेलांमध्ये नोकऱ्या मिळाल्या. शिवसेनेच्या स्थानिय लोकाधिकार समितीमुळे स्थानिक मराठी लोकांना मुंबईतील कंपन्यांमध्ये प्राधान्य देण्यात आले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखे प्रभावी नेतृत्व मिळाल्यामुळे मराठी माणूस मुंबईत ताठ मानेने आणि ताठ कण्याने वावरू लागला.

मराठी चित्रपट असो किंवा अन्य कुठलेही क्षेत्र असो, जिथे मराठी माणसांना न्याय मिळत नसेल तिथे शिवसेना धावून जाऊ लागली. स्थानिक पातळीवरील लोकांचे प्रश्न शिवसेना शाखांच्या माध्यमातून सुटू लागले. अशा प्रकारे शिवसेनेचा प्रसार मुंबईसह महाराष्ट्रात झाला. १९९५ साली शिवसेनेची महाराष्ट्रात भाजपसोबत युतीची सत्ता आली, पण पुढे मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी एकत्र आलेले शिलेदार जसे आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ लागले तसे त्यांच्या स्वतंत्र महत्त्वाकांक्षा प्रबळ होऊ लागल्या.

छगन भुजबळ, गणेश नाईक, नारायण राणे यांच्यासारखे शिवसेनेत सुरुवातीपासून निष्ठेने काम करणारे नेते बाहेर पडले. त्यात शिवसेनेला मुख्य फटका बसला तो राज ठाकरे शिवसेनेतून बाहेर पडले तेव्हा. कारण ती ठाकरे घराण्यात पडलेली फूट होती. त्यातून शिवसेना दुभंगली गेली. जे शिवसैनिक पूर्वी एकत्र लढत होते ते दोन पक्ष झाल्यामुळे एकमेकांच्या विरोधात लढू लागले. त्याचा फायदा अन्य पक्षांना होऊ लागला.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात अनपेक्षित उलथापालथ झाली. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत उद्धव ठाकरे यांच्या विरोधात बहुमताच्या आधारे बंड करून शिवसेना आपल्या ताब्यात घेतली. त्यामुळे मूळ शिवसेनेत तिसरी मोठी फूट पडली. मूळ शिवसेनेतील तीन पक्षांमध्ये विभागले गेलेले नेते आता एकमेकांच्या विरोधात निवडणुकांमध्ये लढत आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे केवळ २० आमदार निवडून आले, तर राज ठाकरे यांच्या मनसेचा एकही आमदार निवडून येऊ शकलेला नाही. ज्या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली, मुंबईत त्या शिवसेनेची अशी अवस्था व्हावी याविषयी मराठी लोकांमध्ये एक चिंतेचा सूर उमटू लागलेला आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी पुन्हा एकत्र यावे, अशी चर्चा सुरू झालेली आहे. मुळात हे विभाजन नेतृत्वाच्या स्पर्धेतून झालेले आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे राज यांना सोबत घेऊन आपला प्रभाव कमी करून घेणार नाहीत. राज ठाकरे यांचा स्वभाव पाहता ते उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काम करतील असे वाटत नाही. सध्या मूळ शिवसेना उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात विभाजित झालेली आहे. हे तीन पक्ष एकत्र येतील असे वाटत नाही. त्यामुळे मराठी माणसांच्या न्याय हक्कांसाठी आता नव्या मराठी सेनेची गरज आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. याविषयीचा प्रश्न ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांना पत्रकारांनी विचारला. त्यावर त्यांनी मोघम उत्तर दिले. महाराष्ट्राविषयी ज्यांना चिंता आणि तळमळ वाटते, त्या सर्व पक्षातील लोकांनी एकत्र यायला हवे, असे ते म्हणाले. म्हणजे ठाकरे बंधू एकत्र येण्याबद्दल ते काही बोललेले नाहीत. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांना एकत्र आणण्यासाठी शिवसेनेतील काही बुजुर्गांनी बरेच प्रयत्न केले होते, पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. पहिली टाळी कोण देणार यावरच सगळे अडून बसले.

# निर्जंतुक कार्टन तंत्रज्ञानासाठी अकुम्स-जगदाळे भागीदारी



**मुंबई (राकेश गायकवाड) :** भारतातील सर्वांत मोठी कॉन्ट्रॅक्ट डेव्हलपमेंट आणि मॅन्युफॅक्चरिंग संस्था (सीडीएमओ) असलेल्या 'अकुम्स' औषधे आणि फार्मास्युटिकल्स लिमिटेडने भारतीय आरोग्य सेवा क्षेत्रातील आघाडीच्या 'जगदाळे इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड' (जेआयएल) बरोबर भागीदारीची घोषणा केली आहे. तयार पेय (रेडी-टू-ड्रिंक) बाजारपेठेसाठी निर्जंतुक उत्पादन आणि त्यानंतर कार्टन पॅकिंगवर (डबे) लक्ष केंद्रित करून आरोग्य आणि निरोगी उत्पादनांची विस्तृत श्रेणी बाजारपेठेत पुरवण्याचे उद्दिष्ट या भागीदारीद्वारे ठेवण्यात आले आहे.

नाविन्यपूर्ण, बिगर-दूध-आधारित निर्जंतुक कार्टन पॅकिंग (बांधणी) उपाय सादर करून बाजारात क्रांती घडवून आणण्याचे 'अकुम्स' आणि 'जेआयएल'चे एकत्रित उद्दिष्ट आहे. यामध्ये प्रामुख्याने, अ) खाद्यपदार्थ, आयुष आणि न्यूट्रास्युटिकल चौकटीअंतर्गत निरोगी पेये. ब) जलसंयोग (हायड्रेशन) आणि पुनर्प्राप्तीसाठी आवश्यक इलेक्ट्रोलाइट्ससह क्रीडा पोषण उत्पादने. क) गंभीर प्रकृती, मधुमेह आणि वजन व्यवस्थापनासाठी पौष्टिक उत्पादने.

ग्राहक आरोग्य, सुविधा आणि गुणवत्तेला अधिकाधिक प्राधान्य देत असल्याने भारतात तयार पेयाच्या बाजारपेठेत लक्षणीय वाढ होत आहे. या भागीदारीद्वारे अकुम्स आणि जगदाळे, उत्कृष्ट निर्जंतुक पॅकेजिंग तंत्रज्ञानासह आरोग्याला फायदेशीर ठरणारी, अखंडपणे एकरूप होणारी उत्पादने वितरीत करतील, असे अकुम्स ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक संजीव जैन म्हणाले. ही निर्जंतुक पॅकिंग सोल्यूशन्स सुरक्षितता, मांडणीतील स्थिरता आणि पोषक धारणेची सर्वोच्च मानके सुनिश्चित करतात, त्याचबरोबर आधुनिक ग्राहकांच्या विकसित गरजा पूर्ण करतात, असेही ते म्हणाले.

'अकुम्स'चे मजबूत आणि व्यापक ग्राहक; 'जगदाळे'च्या आरोग्य सेवा क्षेत्रातील नवकल्पनांचा वारसा यांच्या धोरणात्मक अभिसरणाचे प्रतिनिधित्व या सहयोगाद्वारे होत आहे. 'जगदाळे' समूहाचे व्यवस्थापकीय संचालक (एमडी) राजेश एन. जगदाळे यांनी या सहयोगाच्या संभाव्य परिणामांवर भर दिला. "विश्वास आणि गुणवत्तेचे समानार्थी नाव असलेल्या 'अकुम्स'बरोबर भागीदारी करण्यासाठी आम्ही अत्यंत उत्सुक आहोत. एकत्रितपणे आम्ही भारतातील तयार पेय श्रेणी पुनर्परिभाषित करण्याचे उद्दिष्ट ठेवतो, ज्यामुळे सामूहिक, प्रीमियम आणि वैद्यकीय बाजारपेठेतील ग्राहकांच्या विविध गरजा पूर्ण होतात. बिगर दुधावर आधारित सुसूत्रीकरणावर असलेले लक्ष आमची सर्वसमावेशकता सुनिश्चित करते आणि आहारातील प्राधान्ये आणि रोगप्रतिबंधक आवश्यकतांच्या विस्तृत वर्णक्रमाला संबोधित करते." भारतातील इलेक्ट्रोलाइट आरटीडी बाजारपठे सद्यस्थितीत मजबूत वाढ अनुभवत असून, तिचे मूल्य एक हजार कोटींहून अधिक आहे. दरवर्षी १५० दशलक्षहून अधिक पॅक विकले जातात. आकारमानात स्थिर १० टक्के वार्षिक वाढीसह, या बाजाराला वाढीव मागणी आहे. विशेषत: उन्हाळ्याच्या महिन्यांत, जेव्हा जलसंयोगाची सर्वोच्च आवश्यकता असते. त्याचबरोबर, विस्तृत भारतीय 'आरटीडी' बाजारपेठ लक्षणीय विस्तार अनुभवत आहे. हा विस्तार क्रियात्मक, उपचारात्मक पेये आणि निरोगीपणासाठीच्या उत्पादनांना मिळणाऱ्या पसंतीमुळे प्रेरित आहे. निर्जंतुक कार्टन पॅकिंग तंत्रज्ञान हे या उत्क्रांतीत आघाडीवर आहे, जे आधुनिक ग्राहकांच्या मागण्या पूर्ण करणारे उपाय ऑफर करते.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत संविधान दिन संपन्न



**कल्याण (विवेक गुंजाळ) :** भारतीय संविधान दिनानिमित्त कल्याण डोंबिवली महापालिका मुख्यालयात आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी उपस्थित असलेल्या बहुसंख्य अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्फत संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

यानंतर २६/११/२००८ रोजी मुंबईतील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या नागरिकांना व दहशतवाद्यांशी लढा देताना शहीद झालेल्या हुतात्म्यांना आदरांजली वाहून मौन पाळण्यात आले. महापालिका क्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांतही संविधान दिन साजरा करण्यात आला. तसेच प्रभाग स्तरावर सहा. आयुक्त आणि कर्मचाऱ्यांनी देखील संविधान दिनानिमित्त संविधान उद्देशिकेचे वाचन केले.

# शिवसह्याद्री प्रतिष्ठानच्या माध्यमातून राजगड सफाई मोहीम फत्ते

**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण पूर्वेतील शिवसह्याद्री प्रतिष्ठानच्या माध्यमातून रविवारी ऐतिहासिक राजगड किल्ले सफाई मोहीम ४५ जणांच्या चमुने कचरा वेचून करण्यात आली.



सामाजिक बांधिलकीचा वसा जोपसत आजच्या पिढीला गड किल्ले यांचे ऐतिहासिक महत्त्व पुरातन वसा जोपसण्यासाठी कल्याण पूर्वेतील शिवसह्याद्री प्रतिष्ठान दर वर्षी गड किल्ले सफाई मोहीम राबवितात. या माध्यमातून शिवभक्त सदस्य, युवक, युवती यांच्या सह गड किल्ले दर्शन घडवित गड किल्ले यावर जाऊन कचरा, प्लास्टिक बाटल्या, काचेचे तुकडे गोळा करून संकलित कचर्याची योग्य ती विल्हेवाट लावित गड किल्ले स्वच्छता मोहीम राबिवितात. यापूर्वी रायगड, शिवनेरी, सिंहगड किल्ले स्वच्छता मोहिम राबविली असून समाजापुढे योग्य आर्दश घातला आहे. यंदाच्या वर्षी २४ नोव्हेंबर रविवार रोजी पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची पहिली राजधानी म्हणून ऐतिहासिक महत्त्व असलेल्या राजगड किल्ले स्वच्छता, सफाई मोहिम तब्बल ४५ जणांच्या चमुच्या वतीने करण्यात आली.

कल्याण हून शनिवारी रात्री निघत सकाळी ७.३० वा. सुमारास राजगड पायथ्यापासून ४५ जाणांनी गडावर चढाई करण्यास सुरुवात केली. यामध्ये युवक,युवती, शिवभक्त सदस्य यांचा समावेश होता.या गडावर चढाई दरम्यान रस्त्यातील कचरा, प्लास्टिक बाटल्या, काचसमान तुकडे आदि गोळा करीत संकलन केला. राजगडावर १०.३० वा सुमारास पोहचल्यानंतर राजगड परिसरात झाडलोट करीत पालापाचोळा, कचरा, प्लास्टिक बाटल्या काचसमान तुकडे यांचे संकलन करून परिसर स्वच्छ केला. तसेच याप्रसंगी चमुतील युवक युवतींना प्रोबधन करीत राजगडाचे ऐतिहासिक महत्त्व सांगण्यात आले. एकीकडे मोबाईलचा अति वापर, व्यसनाधीनतेकडे वळू पाहणारी युवा पिढीला आपल्या पूर्वजाचा इतिहास शरीर संपदा यांचे महत्त्व देखील यानिमित्ताने पटविण्यात आले.

गडावरील रस्त्यालगत ठिक ठिकाणी संकलित केलेला कचरा चमूने गडावरून उतरताना पायथ्याशी आणित कचर्याची विल्हेवाट लावण्यासाठी नगरपरिषद कडे देत राजगड स्वच्छता सफाई मोहीम फत्ते केली. तसेच राजगडच्या पायथ्याशी शिवभक्तची पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच शौचालय दुरावस्था प्रश्न या संदर्भात शासन दरबारी पत्रव्यवहार करीत प्रश्न मार्गी लावण्याचा मनसुबा करीत टीमने कल्याण कडे प्रस्थान केले. या मोहीम चे नियोजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सतीश पेडणेकर यांच्यावतीने करण्यात आले होते, मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रदेश अध्यक्ष शरद बिरामणे, उपाध्यक्ष संजय पाटील, खजिनदार सतोष इंगळे यांचे योगदान महत्वपूर्ण होते.

# थंडीसह बाजारात मटारच्या हंगामाला सुरुवात, दरही निम्म्यावर

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** एकीकडे बोचऱ्या थंडीची चाहूल लागली की बाजारातही सगळीकडे टपोरे दाणे भरलेले हिरवे मटार नि लालचुटूक गाजरे नजरेस पडतात. मग आपसूक मटार पुलाव आणि गाजर हलव्याचे बेत ठरतात. सध्या घाऊक आणि किरकोळ बाजारात हिरवा वाटाणा मोठ्या प्रमाणात दाखल होत आहे. त्यामुळे वर्षभर गगनाला भिडलेले दरही निम्म्यावर आले आहेत.

घाऊक तसेच किरकोळ बाजारात गगनाला भिडलेल्या वाटाण्याचा नोव्हेंबर अखेरीस



स्वस्ताईचा हंगाम सुरू होतो. मुंबई कृषी उत्पन्न बाजारात हिरव्या वाटाण्याचा हंगाम सुरू झाला असून आवक वाढण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे प्रतिकिलो शंभरी पार केलेल्या हिरव्या वाटाण्याचे दर निम्म्यावर उतरले आहेत. मागील आठवड्यात घाऊक बाजारात प्रतिकिलो १००-१२० रुपयांवरून उपलब्ध असलेला वाटाणा आता ६०-७० रुपयांवर विक्री होत आहेत. त्यामुळे किरकोळ बाजारातही वाटाणा आवाक्यात आहे.

> एपीएमसीत आता हिरव्या वाटण्याचा हंगाम सुरू झाला असून दर उतरले आहेत. डिसेंबरमध्ये आवक वाढणार असून दर आणखी गडगडतील.
>
> **– बाळासाहेब बडदे, घाऊक व्यापारी,एपीएमसी**

सोमवारी एपीएमसीत १८ गाड्यांतून १२५० क्विंटल आवक झाली आहे. घाऊक बाजारात सध्या वाटाणा ६०-७०रु. तर किरकोळ बाजारात ८०-९० रुपये किलो दराने विक्री होत आहे. पुढील कालावधीत आणखी आवक होऊन दर आणखी कमी होण्याची शक्यता आहे. एक महिन्यापूर्वी घाऊक बाजारात वाटाणा १००-१२० रुपये प्रति किलो उपलब्ध असणारा वाटाणा,आता प्रतिकिलो ६०-७० रुपयांनी विक्री होत आहे तर किरकोळ बाजारात ८०-९०रुपये विक्री होत आहे.

# बाल विवाह प्रथेविरुध्द जिल्ह्यात चित्ररथाद्वारे होणार जाणीव जागृती कार्यक्रम

**ठाणे (यश सावंत) -** बालविवाह प्रतिबंध दिनानिमित्त ठाणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय व सेवा संस्था/महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट (डॉ. कैलास सत्यर्थी फाऊंडेशन संलग्न भारत सरकार) यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह या अनिष्ट प्रथेविरुध्द जिल्ह्यात चित्ररथ हा दि. २७ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२४ या कालावधीत चित्ररथाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. दि.२७ नोव्हेंबर हा बालविवाह प्रतिबंध दिनानिमित्त संपूर्ण देशामध्ये जाणीव जागृती दिन साजरा करण्यात येतो. ठाणे जिल्ह्यातही यानिमित्त बालविवाह प्रथेविरुद्ध जनजागृती करण्यात येणार आहे. ठाणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय व सेवा संस्था/ महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट (डॉ. कैलास सत्यर्थी फाउंडेशन संलग्न भारत सरकार) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ नोव्हेंबर ते १० डिसेंबरम २०२४ या कालावधीत ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात चित्ररथाच्या माध्यमातून जाणीव जागृती करण्यात येणार आहे.

## पान १ वरून...

### ▶▶| महाराष्ट्राच्या उपराजधानीत नव्या...

नवीन सरकारचे स्वागत करण्यात कर्मचारी कोणतीही कसर सोडू इच्छित नाहीत. नागपूरसह विदर्भातील नागरिकांमध्येही उत्साह दिसून येत आहे. या सरकारमधील मुख्यमंत्री नागपूरचाच असेल, अशी त्यांना पूर्ण आशा आहे.

### ▶▶| सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएम हटवण्याची...

केए पॉल यांनी त्यांच्या याचिकेत, निवडणूक आयोगाने निवडणुकीदरम्यान पैसे, दारू आणि इतर प्रलोभने देण्यात दोषी आढळल्यास उमेदवारांना किमान पाच वर्षांसाठी अपात्र ठरवण्याचे निर्देश जारी करण्यासह इतर मागण्या केल्या होत्या. यावेळी न्यायालयासमोर पॉल यांनी असाही दावा केला की, गेल्या काही निवडणुकांमध्ये पैसे वाटले गेले आहेत. एका उद्योगपतीने काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टीसह सर्व प्रमुख ६ पक्षांना १२०० कोटी रुपये दिले आहेत.

### ▶▶| बिनविरोध मतदारसंघ शिंदेंच ध्येय !...

यामुळेच नाराज झालेल्या मनोज यांनी बंडखोरी करत मुख्यमंत्री शिंदे यांच्या विरोधात अपक्ष निवडणूक लढविली. त्यात त्यांचा पराभव झाला. बंडखोरी केल्यामुळे त्यांना पक्षातून सहा वर्षांपासून निलंबित करण्यात आले होते. परंतु भिवंडी पश्चिमेत काँग्रेस उमेदवाराविरोधात बंडखोरी करणाऱ्यांविरोधात मित्र पक्षांनी कोणतीच कारवाई केलेली नाही. यामुळेच नाराज झालेले मनोज शिंदे यांनी अखेर काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन शिंदेच्या शिवसेनेत पक्ष प्रवेश केला आहे. यानिमित्ताने मुख्यमंत्र्यांचे कट्टर विरोधक ते समर्थक असा मनोज यांचा राजकीय प्रवास झाल्याचे दिसून येत आहे.

काँग्रेस पक्षातील अनेक कर्तुत्वान नेते सोडून गेले. यानंतरही आम्ही पक्षाचे काम करित राहिलो. परंतु कोकण पट्ट्याकडे पक्षाच्या नेत्यांनी दुर्लक्ष केले. भिवंडी पश्चिमेत काँग्रेस उमेदवाराविरोधात बंडखोरी करणाऱ्यांविरोधात मित्र पक्षांनी कोणतीच कारवाई केलेली नाही. परंतु पक्षाने मात्र माझ्यावर पहिली कारवाई केली. यासंबंधीचे पत्र पक्षाच्या नेत्यांना पाठविले पण, त्याचीही दखल नेत्यांनी घेतली नाही. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षात अनेक विकासकामे केली. अशा कर्तुत्वान मुख्यमंत्री शिंदे यांना साथ देणे गरजेचे असल्यामुळे मी त्यांच्या पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला, अशी प्रतिक्रिया मनोज शिंदे यांनी दिली.

### ▶▶| सध्या राज्याचे एकनाथ शिंदे काळजीवाहू...

पक्षाकडून निरीक्षक येतात. चर्चा होते आणि सर्वानुमते नेता निवडीची प्रक्रिया पार पडते. त्यामुळे निरीक्षक हे येतीलच. त्यानंतर नेता निवडीचा कार्यक्रम पार पडेल आणि नंतर नव्या सरकारचा शपथविधीचा कार्यक्रम पार पडेल. त्यामुळे निरीक्षक येतील. त्यात शंका नाही", अशी प्रतिक्रिया सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

दरम्यान, शिवसेना नेते गुलाबराव पाटील यांनी देखील प्रतिक्रिया दिली. "मुख्यमंत्रीपदाचा निर्णय एकनाथं शिंदे आणि महायुतीमधील प्रमुख नेते घेतील. एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य आहे. आम्ही सर्व अधिकार एकनाथ शिंदे यांना दिले आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील तो मान्य आहे", अशी प्रतिक्रिया गुलाबराव पाटील यांनी दिली.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# वाहतूक कोंडी टाळण्यासाठी डोंबिवली पश्चिमेतील गुप्ते, फुले रोड एक दिशा मार्ग

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** डोंबिवली पश्चिमेतील सर्वाधिक वर्दळीच्या महात्मा फुले रस्ता आणि घनश्याम गुप्ते रस्त्यांवर आणि त्यांच्या छेद रस्त्यांवर दररोज वाहतूक कोंडी होत आहे. या कोंडीचा सर्वाधिक त्रास नोकरदार वर्ग, शाळकरी विद्यार्थ्यांना बसत आहे. त्यामुळे वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी येत्या एक डिसेंबरपासून हे दोन्ही मार्ग एक दिशा करण्याचा निर्णय घेतला आहे.

या दोन्ही रस्त्यांच्या एक दिशा मार्गांमुळे या रस्त्यांवरील वाहतूक लगतच्या सुभाष रस्ता, पंडित दिनदयाळ रस्ता भागातून वळविण्यात येणार आहे. हा वाहतूक बदल सुरूवातीचे पंधरा दिवस प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येईल. या वाहतूक बदलाला नागरिकांकडून हरकत न आल्यास हा वाहतूक बदल कायमस्वरुपी ठेवण्यात येणार आहे, असे उपायुक्त शिरसाट यांनी वाहतूक बदल अधिसूचनेत म्हटले आहे. डोंबिवली पश्चिमेतील वर्दळीच्या गुप्ते रस्ता, फुले रस्ता आणि या रस्त्यांच्या छेद रस्त्यांवर दररोज वाहतूक कोंडी होत असल्याने रिक्षा चालक मालक संघटनेने दोन महिन्यापूर्वी आंदोलनाचा इशारा दिला होता.


डोंबिवली पश्चिमेत घनश्याम गुप्ते रस्त्यावर गोपी चौकातून डोंबिवली रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना गोपी चौक येथे प्रवेश



बंद करण्यात येणार आहे. ही वाहने गोपी मॉलसमोरील नाना शंकरशेठ रस्त्याने कोल्हापुरे चौक येथून महात्मा फुले रस्ता, सुभाष रस्ता किंवा सम्राट चौक येथून दिनदयाळ रस्त्याने इच्छित स्थळी जातील. महात्मा गांधी रस्त्यावर महात्मा फुले चौक येथे डोंबिवली रेल्वे स्थानकाकडून कोल्हापुरे चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना फुले चौक येथे प्रवेश बंद. ही वाहने डोंबिवली रेल्वे स्थानक विष्णुनगर मासळी बाजार गुप्ते रस्ता, दिनदयाळ रस्ता किंवा क्रांती चौक येथून सुभाष रस्त्याने इच्छित स्थळी जातील. गुप्ते छेद रस्ता क्रमांक एककडून गोमांतक बेकरीमार्गे उजवे वळण घेऊन रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या वाहनांना गोमांतक बेकरी येथे प्रवेश बंद. ही वाहने गोमांतक बेकरी येथे डावे वळण घेऊन गोपी चौक रस्ता, नाना शंकरशेठ रस्ता, फुले रस्ता, सुभाष रस्ता, दिनदयाळ रस्तामार्गे इच्छित स्थळी जातील.

गुप्ते छेद रस्ता क्रमांक दोन येथून अंबामाता मंदिरमार्गे रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या वाहनांना अंबामाता मंदिर येथे प्रवेश बंद. ही वाहने अंबामाता समाज मंदिरमार्गे डावे वळण घेऊन गोपी चौकमार्गे फुले रस्ता अथवा दिनदयाळ रस्त्याने इच्छित स्थळी जातील. गुप्ते छेद रस्ता क्रमांक तीन येथून लक्ष्मी विलास हॉटेलमार्गे रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या वाहनांना लक्ष्मी विलास हॉटेल येथे प्रवेश बंद. ही वाहने लक्ष्मी विलास हॉटेल येथे वळण घेऊन फुले रस्ता, दिनदयाळ रस्तामार्गे इच्छित स्थळी जातील. कर्वे रस्त्यावरून महात्मा फुले रस्त्यावरील मॉन्जिनीज चौक येथून कोल्हापुरे चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना मॉन्जिनीज चौक येथे प्रवेश बंद. ही वाहने सुभाष रस्ता, गुप्ते किंवा दिनदयाळ रस्त्याने इच्छित स्थळी जातील. गुप्ते रस्त्यावरून मॉन्जिनीज चौकमार्गे फुले रस्त्यावरून कोल्हापुरे चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना मॉन्जिजन्स चौक येथे प्रवेश बंद. ही वाहने सुभाष रस्ता, गुप्ते रस्ता किंवा दिनदयाळ रस्त्याने इच्छित स्थळी जातील.

# मुरबाड मध्ये गवाळी खानिवरे परिसरात भुकंपाचे सौम्य धक्के!



**मुरबाड (रोहित जैसवार) -** मुरबाड तालुक्यातील म्हसा परिसरात गवाळी, आंबेगाव, खानिवरे, जांभुर्डे या गावांना रविवारी व सोमवारी संध्याकाळच्या सुमारास जमिन हादरल्याचे नागरिकांचे म्हणने आहे. हादऱ्याने घरातील भांडी पडण्याचा प्रकार घडला असून असा प्रकार आज पर्यंत कधी झाला नसल्याचे येथील ग्रामस्थांचे म्हणने असून हा भुकंपाचा प्रकार असल्याचे गवाळी येथील ग्रामस्थ तथा माजी सरपंच अरुण पष्टे यांनी सांगितले आहे. या भूकंपाच्या धक्काने येथील नागरिकां मध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रशासनाने या गंभीर घटनेची लवकर दखल घेऊन उपाययोजना करावी अशी नागरिकांची मागणी आहे.दरम्यान या घटनेची दखल घेऊन तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी भुकंप तज्ञांशी संपर्क केला असून लवकरच त्यांचे पथक मुरबाड मध्ये पोहचणार असल्याचे सांगितले .

# ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात कुटुंब नियोजनात पुरुषांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी नसबंदी पंधरवडा

**ठाणे (सचिन कदम) -** कुटुंब नियोजनात पुरुषांच्या सहभागास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ठाणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रात २१ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२४ या कालावधीत पुरुष नसबंदी पंधरवडा (Vasectomy Forth_night २०२४) राबविण्यात येत आहे.

या मोहिम कालावधीत लाभार्थींनी पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेबाबत असणारे गैरसमज दूर करून कुटुंब नियोजनाचा स्वीकार करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

या मोहिमेचे घोषवाक्य, "आजच सुरुवात करुया, पती-पत्नी मिळून कुटुंब नियोजनावर बोलुया" असे आहे. ही मोहिम जिल्ह्यात २ टप्प्यात राबविण्यात येत आहे. पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेबाबत माहिती घेण्याकरीता आपल्या कार्यक्षेत्रातील नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी दिली.



**मोहिमेचा पहिला टप्पा- संपर्क आठवडा (कालावधी २१ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०२४)**

पहिल्या टप्यामध्ये आशा व एएनएम, पुरुष नसबंदी पंधवड्याचा प्रचार व प्रसार कार्यक्षेत्रात करून कुटुंब नियोजनास पात्र जोडप्यांना भेटी देऊन पुरुषांचा सहभाग वाढविण्यासाठी त्याच्याशी निगडीत गैरसमज दूर करण्यासाठी समुपदेशन करुन पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेचा स्वीकार करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

**मोहिमेचा दुसरा टप्पा- सेवा आठवडा (कालावधी २८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर)**

दुसऱ्या टप्यामध्ये पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेस ईच्छुक लाभार्थाची पूर्व नोंदणी करून ठराविक दिवशी मार्गदर्शक सुचनांनुसार शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# पनवेलमध्ये शेकापची झुंज गावांपुरतीच?

**पनवेल (भावना जैन) :** भाजपचे पनवेल भागातील प्रभावी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभा निवडणुकीत ५१ हजार मतांनी विजय मिळवला असला तरी या भागातील ग्रामीण भागात शेतकरी कामगार पक्षाला मिळालेली आघाडी ठाकूरांसाठी डोकेदुखी ठरली आहे. लोकसभा निवडणुकीतच पनवेल मतदारसंघातून महायुतीला अपेक्षित मताधिक्य मिळाले नव्हते. शेकाप आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षातील घोळामुळे पनवेलमध्ये महाविकास आघाडीला यश मिळणे कठीण असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत होते. असे असताना पहिल्या काही फेऱ्यांमध्ये मिळालेले मताधिक्य आणि ग्रामीण भागात शेकापने टिकवलेले वर्चस्व हे या मतदारसंघाचे वेगळेपण ठरले.

शेकापच्या बाळाराम पाटील यांना ग्रामीण पनवेलने मोठी साथ दिली. मात्र या मतदारसंघातील शहरी पट्ट्याने शेकापला पुन्हा नाकारल्याचे पाहायला मिळाले. या मतदारसंघात ३ लाख ८२ हजार ३३५ मतदान झाले होते. यापैकी प्रशांत ठाकूर यांना १ लाख ८२ हजार ९३१ मते मिळाली. तसेच शेकापचे बाळाराम पाटील यांना १ लाख ३२ हजार ८४० मते मिळाली. ठाकूर हे ५१,०९१ मतांनी जिंकले. पनवेलमध्ये तिसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या ठाकरे सेनेच्या लीना गरड यांना ४३,९८९ मते मिळाली. मनसेचे योगेश चिले यांना १०,२३१ मते मिळाली. महाविकास आघाडीत ठाकरे सेना आणि शेकाप एकत्र लढली असती तरी ठाकूरांचा विजय निश्चित होता असे मानले जात असले तरी त्यांच्यापुढील आव्हान मात्र वाढले असते.

## शहरी पट्ट्याने शेकापला पुन्हा नाकारल्याचे चित्र

शेतकरी कामगार पक्ष

ज्यावेळेस सहाव्या फेरीची मतमोजणी सुरू झाली तेव्हापासून खारघर वसाहतीची मतमोजणी सुरू झाल्याने चित्र बदलण्यास सुरुवात झाली. बुथ क्रमांक १४१ ते १६५ पर्यंत ठाकूर यांना खारघरमधून मताधिक्य मिळण्यास सुरुवात झाली. खारघरमधील मतदारांनी ठाकूर यांना साहव्या फेरीत ४,८९२ मतांचे सुरुवातीला मताधिक्य दिले. त्यानंतर आठव्या फेरीत कोपरा गाव, बेलपाडा गाव, खारघर वसाहतीचा काही भाग आणि मोरबे, रिटघर, खैरवाडी, रोडपाली, खिडुकपाडा या गावातील १६,७८० मतांची मोजणी केल्यावर ठाकूरांचे मताधिक्य ११,६३८ ने वाढले.

नवव्या आणि दहाव्या फेरीत २९,०८१ मतांच्या मोजणीनंतर वळवली, दुंदरे, केवाळे, वांगणी तर्फे वाजे, वाकडी, टेंभोडे या गावांसह कळंबोली वसाहतीमधून शेकाप पिछाडीवरच राहिला. तोपर्यंत ठाकूर यांचे मताधिक्य १०,८५१ पोहचले होते. अकराव्या आणि बाराव्या फेरीत कळंबोलीचा निम्मा भाग आणि कामोठे शहराचा निम्मा भागातील २७ हजार मतांची मोजणी केल्यानंतर ठाकूर यांचे मताधिक्य १५,५९३ ने वाढले होते. १३ आणि १४ व्या फेरीत कामोठे शहर २९ हजार मतांच्या मोजणीनंतर ठाकूर यांचे मताधिक्य सर्वाधिक २२,९७४ पोहचले होते. पनवेल शहरातील ३० हजार मतांची मोजणी २१ आणि २२ व्या फेरीत झाल्यानंतर ठाकूर यांना ४८,५०६ मतांचे मताधिक्य मिळाले.

## ग्रामीण मतदारांनी ठाकूरांना घाम फोडला

■ या निवडणुकीत सुरुवातीला पाचव्या मतमोजणीच्या फेरीपर्यंत १ ते ११६ बुथमध्ये ओवे पेठे, ओवेकॅम्प, तोंडरे, कोयनावेळे, देवीचा पाडा, ढोंगऱ्याचा पाडा, शिरवली, पालेखुर्द, तळोजा पेठाली, तळोजा पाचनंद, पेणधर, घोट, खैरणे खुर्द, वावंजे, तळोजा मजकूर, खुटारी, रोहिंजण, पिसार्वे, नितळस, धानसर, धरणाकॅम्प, तुर्भे या गाव आणि तळोजा वसाहतीमधील ८१,९०७ मतांपैकी बाळाराम पाटील यांनी ३४,८९१ तर प्रशांत ठाकूर यांना ३४,२०७ मते मिळाली. या परिसरातून बाळाराम पाटील हे आघाडीवर होते.

# ठाणे जिल्हा गारेगार! बदलापुरात सर्वात कमी तापमानाची नोंद

**बदलापूर (विशाल पाटील) -** गेल्या काही दिवसांपासून निरभ्र आकाश आणि रात्री तापमानात होत असलेली घट यामुळे ठाणे जिल्हा गारेगार झाला आहे. दिवसा येणारी कोरडी हवा आणि आर्द्रता कमी असल्याने तापमानात घट होते आहे. त्यामुळे मंगळवारी सकाळी ठाणे जिल्ह्यात सरासरी १४ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली आहे. ठाणे जिल्ह्यात सर्वात कमी तापमान १३.५ अशं सेल्सियस तापमान नोंदवले गेले. तर कर्जत ते ठाण्यापर्यंत गारवा जाणवला.

गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात थंडीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे सर्वदूर गारवा जाणवतो आहे. मंगळवारी ठाणे जिल्ह्यात सर्वात कमी तापमानाची



नोंद झाली. ठाणे जिल्ह्याचे सरासरी तापमान १४ अंश सेल्सियसपर्यंत खाली आले होते. सर्वात कमी तापमान बदलापूर शहरात नोंदवले गेले. बदलापुरात सकाळी १३.५ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेल्याची माहिती खासगी हवामान अभ्यासक अभिजीत मोडक यांनी दिली आहे. तर शेजारच्या अंबरनाथ शहरातही १३.६ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली आहे. पनवेल, पलावा, उल्हासनगर, कल्याण या शहरांमध्ये १४ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले आहे. तर डोंबिवली, नवी मुंबई आणि ठाणे शहरात सरासरी १५ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले आहे.

रात्री निरभ्र आकाश असल्याने तापमानात घट होते आहे. त्यात दिवसा ईशान्येकडून येणारी कोरडी हवी आणि आर्द्रता घटल्याने तापमानात घट होते आहे, अशी माहिती मोडक यांनी दिली आहे. येत्या ३० नोव्हेंबरपंर्यत तापमान अशाच प्रकारे कमी होत जाणार असल्याचेही मोडक यांनी सांगितले आहे. हवामानात गारवा असल्याने सकाळच्या सुमारास स्वेटर, कानटोपीचा वापर वाढला आहे. रेल्वेने प्रवास करणारे नोकरदार थंडीपासून रक्षण करण्यासाठी स्वेटर वापरत असल्याचे दिसते आहे. अनेक जण या थंडीचा आनंद घेण्यासाठी सकाळी घराबाहेर पडत आहेत.

## शहरनिहाय तापमान

- बदलापूर १३.५
- अंबरनाथ १३.६
- पनवेल १४
- पलावा १४.३
- उल्हासनगर १४.५
- पालघर १४.६
- कल्याण १४.७
- डोंबिवली १५
- नवी मुंबई १६
- ठाणे १६.६

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

# अर्ज करण्याची दि.३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत अंतिम मुदत

**ठाणे (यश सावंत) -** शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील जे विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२४ आहे. विद्यार्थ्यांनी या योजनेसाठी https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करून अर्जाची प्रिंट सर्व कागदपत्रांसह सहायक आयुक्त कार्यालयात जमा करावे, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी कळविले आहे.



महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील जे विद्यार्थी शासकीय वसतिगृह प्रवेशास पात्र असून शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यासाठी शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केलेली आहे.

या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळावर करता येणार आहे. अर्ज भरण्यासाठी अंतिम मुदत दि. ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी विहित मुदतीच्या अगोदर अर्ज करून त्याची प्रिंट सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, ४था मजला, दत्तवाडी, खारेगाव, कळवा, जि. ठाणे. ४००६०५ या कार्यालयास सादर करावेत, असे आवाहन श्री. इंगळे यांनी केले आहे.

# पालघर जिल्हा परिषदेत संविधान दिन साजरा



**पालघर (सुचिता सोनावणे) -** आज दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषद पालघर येथे संविधान दिन साजरा करण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, बांधकाम व आरोग्य समिती सभापती संदेश ढोणे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे, जिल्हा कार्यक्रमाधिकारी महिला व बालविकास प्रवीण भावसार, शिक्षणाधिकारी माध्यमिक संगीता भागवत, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत साळुंखे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषदेमधील संविधान स्तंभाजवळ संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. शिक्षणाधिकारी प्राथमिक सोनाली मातेकर यांनी उद्देशिकेचे वाचन केले.

भारतीय संविधान दिन हा २६ नोव्हेंबर रोजी भारतभर साजरा केला जातो.२९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या राज्यघटनेच्या निर्मितीसाठी मसूदा समिती स्थापन झाली. अनेक बैठका व चर्चासत्रांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान समितीने स्वीकारला होता.भारताची राज्यघटना २६ नोव्हेंबर ला तयार झाली असल्याने २६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने जिल्हा परिषदेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले. तसेच यावेळी २६/११/२००८ रोजी मुंबई मधे झालेल्या अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी आणि नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# प्राजक्ता माळीचा देवावर विश्वास आहे का? चाहत्याच्या प्रश्नाचं एका शब्दात दिलं उत्तर...



मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी सध्या तिच्या 'फुलवंती' चित्रपटामुळे चर्चेत आहे. तिच्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. चित्रपट हिट झाल्याने प्राजक्ता खूप आनंदी आहे. सध्या प्राजक्ता मुंबईत नाही तर बँगलोर येथील 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या आश्रमात आहे. तिथून ती अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करत आहे.

प्राजक्ता माळीने नुकताच तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर केला. "महाराष्ट्रावर आणि कलेवर इतकं प्रेम नसतं तर या घडीला मी बँगलोर आश्रमात आश्रमवासी असते.

होय होय...इथे राहणं, ध्यान करणं इतकं आवडतं. आश्रमवासी नाही होऊ शकले तरी निदान १५-२० दिवस इथे सेवा करायला नक्कीच येईन. आणि सातत्याने इथे येत राहीन," असं कॅप्शन प्राजक्ताने या व्हिडीओला दिलं आहे. या व्हिडीओत ती आश्रमात काय करतेय, कोणत्या गोष्टी शिकतेय याबाबत तिने सांगितलं.

प्राजक्ताच्या याच व्हिडीओवर तिला एका चाहत्याने देवासंदर्भात एक प्रश्न विचारला. त्याचं उत्तर प्राजक्ताने दिलं आहे. 'तुझा देवावर विश्वास आहे का प्राजक्ता?' असं विचारणाऱ्याला प्राजक्ता माळीने 'होय' असं उत्तर दिलं आहे.

चाहत्याचा प्रश्न अन् प्राजक्ता माळीचं उत्तर

दरम्यान, प्राजक्ताच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास तिचा ड्रीम प्रोजेक्ट असलेला 'फुलवंती' सिनेमा ऑक्टोबर महिन्यात प्रदर्शित झाला. यात तिच्याबरोबर गश्मीर महाजनी मुख्य भूमिकेत होता. हा चित्रपट हिट झाला असून तो प्राइम व्हिडीओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवरही प्रदर्शित झाला आहे.

# "परमेश्वरा मी थकतोय", पुष्कर जोगच्या 'त्या' पोस्टने वेधलं लक्ष...

अभिनयासह निर्मिती, दिग्दर्शन उत्तमरित्या पेलणाऱ्या अभिनेत्यांपैकी एक म्हणजे पुष्कर जोग. सध्या पुष्कर नवनवीन विषयांवर वेगळ्या धाटणीचे चित्रपट प्रेक्षकांच्या मनोरंजनसाठी घेऊ येत आहे. काही महिन्यांपूर्वी पुष्करचा 'द एआय धर्मा स्टोरी' नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात त्याच्याबरोबर अभिनेत्री दिप्ती लेले आणि स्मिता गोंदकर महत्त्वाच्या भूमिकेत झळकल्या होत्या. पुष्करच्या या चित्रपटाची कथा अनेक प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस पडली. अशातच पुष्करने नुकतीच एक पोस्ट इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे. या पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.

अभिनेता पुष्कर जोग सोशल मीडियावर खूप सक्रिय असतो. आपल्या आगामी कामाबद्दल, वैयक्तिक आयुष्याबद्दल पोस्ट करत असतो. तसंच राजकीय, सामाजिक घडामोडींवर परखड मत मांडत असतो. यामुळे अनेकदा पुष्कर जोग ट्रोलही झाला आहे. पण, या ट्रोलिंग त्याने सडेतोड उत्तर दिलं आहे.

पुष्कर जोगने नुकताच इन्स्टाग्राम स्टोरीवर स्वतःचा फोटो पोस्ट केला आहे. या फोटोवर त्याने मोजक्या शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. "परमेश्वरा मी थकतोय...एकटा लढतोय...खूप वापरुन घेतात...खूप फसवतात...मी जोपर्यंत जिंकत नाही तोपर्यंत कायम लढत राहीन." या स्टोरी नंतर पुष्करने लेकीचा व्हिडीओ शेअर केला आहे आणि लिहिलं की, माझ्या प्रेमा अशीच हसत आहे. शेवटच्या श्वासापर्यंत मी तुझी काळजी घेईन.



त्यानंतर पुष्करने आणखी एक पोस्ट लिहिली आहे. यामध्ये अभिनेत्याने लिहिलं की, माझ्या देवांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये...मी सर्वांना सांगितलं की, तुम्ही मला आशीर्वाद दिला नाही तर मी ग्रुप सोडेन...मग सर्व देवांनी व्हॉट्सअप ग्रुप सोडला आणि प्रत्यक्ष भेटले, घट्ट मिठी मारली आणि म्हणाले, सदैव धन्य राहा. मी हसलो आणि लगेच माझी आई आणि मुलीला ग्रुपमध्ये घेतलं. पुष्करच्या या पोस्ट सध्या चांगल्याच चर्चेत आल्या आहेत.

# भूषण प्रधानच्या वाढदिवशी 'Love You' म्हणत अनुषाने लिहिली खास पोस्ट...



यंदाचं वर्ष अभिनेता भूषण प्रधानसाठी खूपच खास ठरलं. कारण, यावर्षी त्याने 'जुनं फर्निचर' आणि 'घरत गणपती' या दोन्ही गाजलेल्या चित्रपटांमध्ये प्रमुख भूमिका साकारल्याचं पाहायला मिळालं. त्याचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. नुकताच भूषणने त्याचा ३८ वा वर्ष वाढदिवस साजरा केला. यानिमित्ताने संपूर्ण कलाविश्वातून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

यादरम्यान अभिनेत्री अनुषा दांडेकरने शेअर केलेल्या एका पोस्टने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे.

गेल्या काही महिन्यांपासून भूषण प्रधान आणि अनुषा दांडेकर यांचे रोमँटिक फोटो सोशल मीडियावर चर्चेत येत आहेत. यामुळे त्यांचं अफेअर असल्याच्या चर्चा सुद्धा रंगल्या आहेत. यंदाच्या दिवाळीत भूषण-अनुषाने अनेक पार्ट्यांना एकत्र उपस्थिती लावली होती. त्यामुळे सर्वत्र त्यांच्या डेटिंगच्या चर्चा सुरू आहेत. अशातच भूषणच्या वाढदिवसानिमित्त खास पोस्ट शेअर करत अनुषाने याबरोबर एक खास व्हिडीओ शेअर केला आहे.

अभिनेत्री भूषणला शुभेच्छा देताना लिहिते, "वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा भुशी! येणारं प्रत्येक वर्ष तुझ्यासाठी अविश्वसनीय आणि भरभराटीचं ठरो. तू खूप जास्त हुशार आहेस आणि आता तुझ्या हुशारीची झलक संपूर्ण जगाने पाहावी अशी माझी मनापासून इच्छा आहे. मला नेहमी आनंदी ठेवल्याबद्दल थँक्यू, मला छोट्या-छोट्या गोष्टी सरप्राइज म्हणून दिल्याबद्दल थँक्यू. तुझं मन खरंच खूप मोठं आहे. एक सच्चा माणूस, चांगला मुलगा, भाऊ, एक खूप छान मित्र आणि तुझ्यातल्या याच गोष्टी मला खूप आवडतात. तू सर्वांवर मनापासून प्रेम करतोस. आपले स्वभाव एकदम जुळतात आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे तुझा स्वभाव खूप खरा आहे... हा खरेपणा कायम जपून ठेव. मी तुला फक्त वर्षभर ओळखतेय पण, आता हे वर्ष शंभर वर्षांइतकं वाटतंय... ही खरंच खूप चांगली गोष्ट आहे ना? लव्ह यू! भूषण प्रधान"

अनुषाने या पोस्टबरोबर एक खास व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये हे दोघंही विविध ठिकाणी फिरून आल्याचं पाहायला मिळत आहे. या पोस्टवर सेलिब्रिटींसह नेटकऱ्यांनी कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. "लवकर लग्न करा", "तुम्ही दोघंही एकत्र खूप छान दिसता लग्न करा", "परफेक्ट आणि मेड फॉर इच अदर", "सुंदर जोडी", "हे दोघंही डेट करत आहेत का", "दोघांचं जमलंय का", "तुम्ही दोघंही एकत्र छान दिसता" अशा प्रतिक्रिया या व्हिडीओवर आल्या आहेत.

# स्मरणशक्ती आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी फायदेशीर आहे काळे जिरे



काळ्या जिऱ्यामध्ये अनेक आरोग्यवर्धक गुण दळलेली आहेत. काळं जीरं लोह, सोडियम, कॅल्शियम, पोटॅशियम आणि फायबर सारख्या पोषक घटकांचा भांडार आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थने केलेल्या अभ्यासानुसार काळ्या जिऱ्यामुळे हृदयाचं आरोग्य सुधारते तसंच रोगप्रतिकार आणि स्मरणशक्ती वाढवण्यासाठी काळं जीरं फायदेशीर आहे.

**हृदयाचं आरोग्य सुधारते :** काळ्या जिऱ्यामध्ये पॉली आणि मोनोअनसॅच्युरेटेड फॅटी अॅसिड असतात. हे कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी आणि हृदयाच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी हे फायदेशीर आहे. त्यामुळे तुम्ही तुमच्या आहारात काळ्या जिऱ्याचा नियमित समावेश करू शकता.

**मधुमेह :** मधुमेहावर नियंत्रण ठेवण्यासाठी काळे जिरे हा एक चांगला उपाय आहे. हे रक्तातील साखरेचं प्रमाण नियंत्रित ठेवण्यास मदत करते. दोन ग्रॅम काळे जिरे सकाळी रिकाम्या पोटी घ्या. यात असलेल्या शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्समुळे टाइप २ मधुमेह टाळण्यास मदत होते.

**पचन :** काळे जिरे हा पचनसंस्थेच्या समस्यांवर एक उत्तम उपाय आहे. आम्लपित्त, पोट फुगणे आणि अल्सरसाठी हे एक उत्कृष्ट उपाय आहे. पाच मिली हळदीचं तेल मधात मिसळून सेवन केल्यास पचनाच्या समस्यांपासून आराम मिळतो.

मुळव्याध आणि बद्धकोष्ठताः मुळव्याध आणि बद्धकोष्ठतेवरही काळे जिरे हा उत्तम उपाय आहे. त्यासाठी एका ग्लास काळ्या चहामध्ये २.५ मिली काळे जिरे तेल टाकून सकाळी रिकाम्या पोटी आणि रात्री झोपण्यापूर्वी प्या.

**चयापचय सुधारते :** काळ्या जिऱ्याच्या सेवनामुळे चयापचय सुधारते. तसंच लठ्ठपणा कमी करण्यास मदत होते. कोमट पाण्यात काळ्या जिऱ्याची पावडर आणि मध टाकून सकाळी रिकाम्या पोटी प्यायल्यास चयापचय सुधारण्यास फायदा होतो.

**रोगप्रतिकार शक्ती वाढते :** काळ्या जिऱ्यामध्ये अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. हे रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास आणि विविध रोगांपासून संरक्षण करण्यास मदत करतात. त्यासाठी प्रत्येकी अर्धा चमचा काळ्या जिऱ्यामध्ये मध एकत्र करून रिकाम्या पोटी घ्या.

स्मरणशक्ती सुधारतेः काळे जिरे मेंदूच्या आरोग्यासाठी चांगले आहे. स्मरणशक्ती आणि बुद्धिमत्ता वाढवण्यासाठी हे खूप फायदेशीर आहे. पार्किन्सन रोग आणि स्मृतिभ्रंश यांच्याशी लढण्यासाठी देखील काळ्या जिऱ्याचे नियमित सेवन चांगले आहे. झटके रोखण्यासाठी देखील हे फायदेशीर आहे. त्यासाठी 1 चमचा काळ्या जिऱ्याचे तेल पुदिना आणि उकळलेल्या पाण्यात मिसळून पिऊ शकता.

# हिवाळ्यात या ड्रिंक्सने वाढेल रोगप्रतिकारशक्ती

हिवाळ्यात थंडी जास्त असल्यामुळे आपली रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते. अशातच व्हायरल इन्फेक्शन ही जवळपास प्रत्येक घरातील समस्या ठरते. ताप सर्दी आणि खोकला हे सर्व आजरा लगेच उद्भवतात. या आजारांकडे दुर्लक्ष केले तर समस्या अजून वाढू शकते. हिवाळ्यात आपली प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपाय करू शकता. या दिवसात आपल्याला इम्युनिटीची गरज असते, त्यामुळे तुम्ही काही घरगुती हेल्थी ड्रिंक्स बनवू शकता आपली रोगप्रतिकारशक्ती वाढवू शकता. आज आपण जाणून घेऊयात, हिवाळ्यात कोणत्या ड्रिंक्सने आपली रोगप्रतिकारशक्ती वाढेल.




**तुळशीचा चहा** - हिवाळ्यात तुळशीचा चहा उत्तम असतो .तुम्ही घरीच हा चहा बनवू शकता. प्रतिकारशक्ती मजबूत करण्यासाठी एक कप पाण्यामध्ये ७ ते ८ तुळशीची पाने उकळा. त्यामध्ये चिमूटभर मध आणि मिरी घाला. नियमित तुळशीचा चहाचं सेवन केल्याने इम्युनिटी वाढेल.

**हळदीचे दूध** - हळदीमध्ये अँटीऑक्सिडंट आणि अँटीइन्फ्लेमेटरीचे गुणधर्म असतात. हळदीच्या दुधात थोडं मध आणि सुंठ पावडर घालून प्यायल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढेल.

**आल्याचा चहा** - आल्यामध्ये असलेल्या अँटीबॅक्टेरियल आणि अँटीव्हायरल गुणधर्मांमुळे ते सर्दी आणि खोकल्यावर उपयुक्त आहे. या चहात थोडं लिंबाचा रस आणि मध घालून पिल्यास आजार त्वरित दूर होऊन जातील.

**लिंबूपाणी आणि मध** - गरम पाण्यात लिंबाचा रस आणि मध मिसळून घेतल्याने शरीरात व्हिटॅमिन सी चं प्रमाण वाढतं, ज्यामुळे इम्युनिटी मजबूत होते.

**ड्रायफ्रूट मिल्कशेक** - बदाम, काजू, अक्रोड आणि खजूर घालून बनवलेला मिल्कशेक शरीराला उष्णता देतो आणि पोषणमूल्ये वाढवतो. हिवाळ्यात थकवा कमी करण्यासाठी हे उत्तम पेय आहे.

**काढा** -तुळस, आलं, मिरी, दालचिनी, आणि गवती चहा घालून बनवलेला काढा रोगप्रतिकारशक्ती वाढवतो. हे सर्दी, खोकला इत्यादी आजार देखील होतात.

**गुळ-आलं पाणी**- गरम पाण्यात गूळ आणि आलं मिसळून घेतल्याने पचन सुधारतं आणि शरीर उष्ण राहते.

या सर्व ड्रिंक्सने हिवाळ्यात रोगप्रतिकारशक्ती वाढेल आणि शरीर देखील सुदृढ राहील.




**मेष** – समाजात तुमचा मान-सन्मान वाढेल. कामाबाबतच्या सर्व चिंता दूर होतील. विरोधक कट करण्याचा प्रयत्न करतील.

**वृषभ** - आपले बोलणे थोडे सौम्य ठेवा. महत्त्वाच्या कामात यश मिळेल. केस जिंकता येऊ शकते. वाहनाचा वेग नियंत्रणात ठेवा.

**मिथुन** – प्रगतीचा नवा टप्पा गाठता येईल. तुमचा बौद्धिक कस लागू शकतो. आपल्या संसारासाठी चांगली खरेदी कराल.

**कर्क** – इतरांची चूक सुधारावी लागेल. नोकरीत तुमचा प्रभाव वाढेल. आपले विरोधक ओळखून ठेवा. कल्पनाशक्तीला चालना मिळेल.

**सिंह** – सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. इतरांना मदत करण्यात आपण आनंद मिळवाल. घरातील ज्येष्ठांची काळजी घ्यावी.

**कन्या** – तुमच्यातील दिलदारपणा दिसून येईल. मानसिक चिंता बाजूला साराव्यात. पारमार्थिक क्षेत्रातील व्यक्तींची गाठ पडेल.

**तूळ** – नातेवाईकांशी सलोखा वाढवावा लागेल. व्यवसायातून चांगला नफा मिळवाल. कामांची गर्दी होईल. काटकसरीने वागावे लागेल.

**वृश्चिक** – महत्त्वाची कामे होतील. कल्पनाशक्तीचे कौतुक होईल. अती अपेक्षा बाळगणे चुकीचे ठरेल. हातातील संधी सोडू नका.

**धनु** – जोडीदाराची उत्तम साथ लाभेल. मनातील उदासवाणे विचार काढून टाका. पैशांची नड भागली जाईल. रागाला आवर घाला.

**मकर** – मान-प्रतिष्ठा मिळणारी घटना घडेल. सामुदायिक गोष्टींमध्ये फार लक्ष घालू नका. कौटुंबिक खर्चाचे गणित नव्याने मांडावे.

**कुंभ** – तुमचा निर्णय योग्य असला तरी त्यावर टीका होऊ शकते. घरात तुमचे प्रभुत्व राहील. काहीतरी नवीन शिकायला मिळेल.

**मीन** – ठरवलेले काम पूर्ण कराल. धंद्यात वाद वाढवू नका. तुमच्यातील आशावाद वाढीस लागेल. आध्यात्मिक प्रगती साधता येईल.

# मराठी बोलल्याने रेल्वे कर्मचाऱ्याने नाकारले तिकीट

**मुंबई (राकेश गायकवाड) -** केंद्र सरकारने अलीकडेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. मात्र ज्या महाराष्ट्रात अन् मुंबईत मराठी भाषा रुजली, त्याच ठिकाणी मराठी भाषेवरून केल्या जाणाऱ्या अपमानजनक घटना सातत्याने घडत आहेत. एकीकडे मराठी माणसांना मुंबईत घरे नाकारली जातायत, तर दुसरीकडे मराठी माणसांना नोकरीवर घेणार नाही, अशी भूमिका काही परप्रांतीयांकडून घेतली जात आहे. त्यातच मुंबईत पुन्हा एकदा मराठी भाषेविरोधातील संतापजनक घटना समोर आली. या घटनेत मुंबईतील एका रेल्वेच्या तिकीट खिडकीवरील कर्मचाऱ्याने मराठी बोलल्यामुळे एका प्रवाशाला तिकीट नाकारल्याची बाब समोर आली आहे. इतकेच नाही, तर मराठी भाषेचा अपमान केल्यानंतर त्याने माफी मागणार नाही, अशी संतापजनक भूमिका घेतली. या घटनेचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान



व्हायरल होतोय; ज्यात एका परप्रांतीय रेल्वे कर्मचाऱ्याचा मुजोरपणा पाहून संताप व्यक्त केला जात आहे.

यावेळी "मला मराठी येत नाही, तुम हिंदीत बोला, मी माफी मागणार नाही" असे संतापजनक विधानही त्या रेल्वे कर्मचाऱ्याने केले आहे. घटना अशी आहे की, मुंबईतील नाहूर रेल्वेस्थानकावर तिकिट घेणाऱ्या मराठी माणसाने मराठीचा आग्रह धरला. मात्र, तिकीट खिडकीवरील कर्मचाऱ्याने मला मराठी येत नाही, असे म्हणत हिंदीत बोला, असे म्हटल्याने त्या मराठी माणसाचा राग अनावर झाला. या घटनेचा व्हिडीओ मराठी एकीकरण समितीने त्यांच्या सोशल साईट्सवर पोस्ट केला आहे.

या व्हिडीओमध्ये घटनेच्या वेळी रेल्वे कर्मचारी आणि मराठी प्रवाशामध्ये झालेला संवाद रेकॉर्ड करण्यात आला आहे. हाच मराठी प्रवासी मोबाईलमध्ये त्या कर्मचाऱ्याचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करत म्हणतोय, "आता तू मवाळ भाषेत का बोलतोयस; मगाशी हिंदी भाषेत बोलण्यास सांगत होतास" त्यावर तो रेल्वे कर्मचारी "मला मराठी भाषा येत नाही; मग मी कसं बोलणार", असे म्हणतो. त्यानंतर तो प्रवासी त्याला प्रश्न विचारतो की, "तुझं नाव काय आहे, नावचं बक्कल कुठे आहे?" ज्यावर तो रेल्वे कर्मचारी आधी हसतो आणि नंतर संतापून म्हणतो, "तुम्हाला काही अधिकारी नाही. मी माझं नाव तुम्हाला दाखवून, माझी ओळख विचारण्याचा तुम्हाला काही अधिकार नाही". मराठी प्रवासी पुन्हा त्याला, तुझं नाव काय, असा सवाल करतो. त्यावर रेल्वे कर्मचारी, "तुम्हाला जे करायचे ते करा, रांग लागलीय तुम्ही बाजूला उभे राहा," असं सांगतो. त्यावर मराठी प्रवासी त्याला, "तू मला हिंदीत बोलायला का लावतोस? तू माझी माफी माग," असा जाब विचारत, माफीची मागणी करतो. पण रेल्वे कर्मचारी ती मागणी धुडकावून लावत, मी "माफी मागणार नाही," अशी भूमिका घेतो, तसेच "मला मराठी येत नाही. तुम्ही हिंदीत बोला एवढेच मी बोलतोय," असे म्हणतो. यावेळी इतर प्रवासीदेखील कर्मचाऱ्याला सांगतात की, सगळ्याच प्रवाशांना हिंदी बोलता येत नाही. इथपर्यंत येऊन व्हिडीओ संपतो.

# समता विद्या मंदिरात संविधान रॅली



**घाटकोपर (राकेश गायकवाड) -** भारतीय संविधान अमृत महोत्सवाच्या निमित्ताने आज साकीनाका येथील समता विद्या मंदिर शाळेत विद्यार्थ्यांनी संविधान दिवस साजरा केला. सकाळी ८ वाजता विद्यार्थ्यांनी संविधान प्रत हातात घेत , तिरंगी झेंडा फडकावत परिसरातून संविधान रॅली काढली. शाळेचे सचिव राजेश सुभेदार , संचालिका ज्योती सुभेदार यांच्या संकल्पनेतून संविधान रॅली आयोजित करण्यात आली. इयत्ता चौथी ते इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी या रॅलीत सहभाग घेतला.

**SPORT**

# After India's Massive Win Over Australia Under Jasprit Bumrah's Captaincy, BCCI Says This About Skipper Rohit Sharma

**New Delhi -** The Board of Control for Cricket in India (BCCI) vice-president Rajeev Shukla on Tuesday lauded Team India for the massive 295-run win over Australia in the Perth Test of the Border-Gavaskar Trophy. India staged a stunning comeback from a series whitewash against New Zealand at home, defeating Australia by 295 runs in Perth despite being bowled out for a mere 150 runs in their first innings. Speaking to ANI, Rajeev Shukla said that the triumph over Australia in Perth was of great importance. He added that both the Indian bowlers and batters performed well in the game.

The BCCI vice-president also confirmed that Rohit Sharma will be playing the upcoming second Test and lead the side against the Aussies.

"The victory in Perth is of great importance. Our bowlers and batsmen played very well...Rohit Sharma will be playing the second test as the Captain...," Rajeev Shukla told ANI.

Meanwhile, Indian skipper Rohit Sharma started practising in the nets as he joined the team in Australia for the Border-Gavaskar Trophy after the birth of his second child.

In the first Test match of the Border-Gavaskar Trophy, India won the toss and opted to bat first. However, they were dismissed for just 150 runs, with Nitish Kumar Reddy (41 off 59 balls, six fours and a six) and Rishabh Pant (37 off 78 balls, three fours and a six) playing crucial knocks and adding a vital 48-run partnership for the sixth wicket.



Josh Hazlewood (4/29) was the standout bowler for Australia, with Pat Cummins, Mitchell Marsh, and Mitchell Starc claiming two wickets each. Australia's reply was even worse, as they were reduced to 79/9 before Mitchell Starc (26) and Alex Carey (21) took the total to 104, giving India a slender lead of 46 runs.

Jasprit Bumrah starred for India with figures of 5/30 in 18 overs, while debutant Harshit Rana impressed with 3/48.

In their second innings, India amassed a massive lead. KL Rahul (77 off 176 balls, five fours) and Yashasvi Jaiswal (161 off 297 balls, 15 fours and three sixes) put up a 201-run opening partnership. Despite losing quick wickets, an unbeaten 100 by Virat Kohli (143 balls, eight fours and two sixes), supported by Washington Sundar (29 off 94 balls, one six) and Nitish Kumar Reddy (38* off 27 balls, three fours and two sixes), propelled India to 487/6 declared, setting Australia a daunting target of 534 runs.

Nathan Lyon (2/96) was the best bowler for Australia, with Cummins, Starc, and Hazlewood taking one wicket each.

At stumps on Day 3, Australia were 12/3, with Bumrah taking two wickets and Mohammed Siraj one. On Day 4, despite valiant efforts from Travis Head (89 off 101 balls, eight fours) and Mitchell Marsh (47 off 67 balls, three fours and two sixes), Australia were bowled out for 238, giving India a resounding 295-run victory.

Bumrah (3/42) and Siraj (3/51) led the bowling in the second innings, while Washington Sundar took two wickets, and Nitish Kumar Reddy and Harshit Rana picked one each.

Stand-in skipper Jasprit Bumrah was named 'Player of the Match' for his eight wickets in the game.

# Priyansh Arya, who hit 6 sixes in an over, and is trained by Gautam Gambhir's coach, to now be mentored by Ricky Ponting

**New Delhi -**The Indian Premier League has, time and again, proven itself to be the platform where talent indeed meets opportunity. The IPL auction has launched the careers of countless young talents across the country, and the recent event in Jeddah, Saudi Arabia, was no exception. The IPL 2025 mega-auction, held on Sunday and Monday, proved to be an unforgettable moment for 23-year-old Delhi batter Priyansh Arya. The left-hander, with a base price of INR 30 lakh, was snapped up by Punjab Kings for an impressive INR 3.8 crore.

Priyansh Arya gained national recognition after he smashed six consecutive sixes in an over while playing for South Delhi Superstarz against North Delhi Strikers in the Delhi Premier League. During his innings, Arya scored 120 runs, including 10 sixes and 10 fours. Not many know that Priyansh Arya is coached by the same man who has shaped the careers of several Delhi players, such as Gautam Gambhir, Amit Mishra, Nitish Rana, and Unmukt Chand, to name a few.

Sanjay Bharadwaj, the man behind the youngster's rise, is not at all surprised with the amount Priyansh Arya went for in the auction, saying he was always confident about the left-hander fetching nearly INR 3 crore.

"I had hopes of Priyansh going for at least INR 3 crore. I had told his father already that your son will definitely go for at least INR 2 crore 70 lakh,"



Sanjay Bharadwaj told Hindustan Times. What made him so confident though? "I had intuition, he recently scored a century in Syed Mushtaq. The running performance always increases your bid."Many recognize Priyansh Arya for his standout performances in the Delhi Premier League, but it might surprise you to learn that the teenager has been turning heads since last year's Syed Mushtaq Ali Trophy. The 2023-24 SMAT saw Priyansh emerging as Delhi's leading run-scorer, registering 222 runs in seven innings at an average of 31.71 and a strike rate of 166.91. Before the IPL 2025, Priyansh once again put the franchises on notice as he smashed his maiden SMAT century against Uttar Pradesh at the Wankhede Stadium.

Priyansh, known for his powerful batting style, went unsold in the IPL 2024 auction. However, the young Delhi boy found success the second time around. Coach Bharadwaj highlighted how Priyansh's exuberance and unique playing style have influenced his own coaching methods.

# 'You are and will always remain my younger brother' - Parth Jindal bids farewell to Rishabh Pant

**New Delhi -**Delhi Capitals failed to retain Rishabh Pant after the two parties didn't agree on terms. The keeper-batter later clarified that it wasn't about money but didn't reveal much detail about his partition with DC. In the IPL 2025 mega-auction, Lucknow Super Giants signed the India international for a staggering INR 27 crore - with that, Pant became the costliest player in the history of the Indian Premier League (IPL).



LSG and Sunrisers Hyderabad were in contention before the prior bid of INR 20.75 crore. The Capitals decided to use their Right to Match (RTM) card, but Lucknow increased their bid to INR 27 crore, which Delhi couldn't match. Pant went on to join the Super Giants and is very likely to be named the new captain of the franchise.

In the meantime, DC co-owner Parth Jindal sent out a statement stating that he tried everything to make Pant happy in Delhi but in the end, it wasn't meant to be. He revealed to be sad to see the cricketer leave, and mentioned that he hopes to reunite with his 'younger brother' someday in the future.

"To Rishabh, you are and will always remain my younger brother - from the bottom of my heart I love you and I have tried everything to make sure you are happy and have treated you like my family. I am very sad to see you go and I am very emotional about it. You will always be in DC, and I hope one day we can reunite.

# In Sudden Move, Gautam Gautam Gambhir Flies Back Home Over 'Family Emergency'

**New Delhi -** In a sudden move after Team India's victory against Australia in the opening Test of the 5-match series in Perth, head coach Gautam Gambhir has reportedly flown back home. The development comes unexpectedly since there wasn't any plan for Gambhir or any other member of the team to head back home. Gambhir reportedly informed the Board of Control for Cricket in India (BCCI) of a 'personal reason' that required him to fly back. It isn't yet known exactly when the India coach would return but he is likely to reunite the team before the second Test



in Adelaide.

A report in Indian Express suggested that Gambhir has spoken to the BCCI about his travel plans. The board had no problem in accepting his request.

"Gambhir has informed us that he will be travelling back home and will join the team before the start of the second Test. He has cited personal reasons and the BCCI has accepted his request," the paper quoted a source as saying.

The Indian team is set to travel to Canberra on Wednesday to play a two-day pink-ball tour game, but Gambhir won't be part of the squad for that practice game. The practice match is scheduled to start on Saturday, as the team looks to gear up for the day-night Test in Adelaide.

The exact reason behind Gambhir's sudden departure isn't known. As the head coach flies back home, the Indian team has been reunited with skipper Rohit Sharma who had missed the first Test in Perth due to the birth of his baby boy.

Rohit was spotted sitting with Gambhir in the Indian dressing room on Day 4 of the series opener against Australia. The opening batter was also spotted practicing with the pink-ball in the nets on Monday as he looked to get some work done ahead of the Adelaide clash.

# सर्प व विंचू दंशाने होणारे मृत्यू शून्यावर आणण्यासाठी प्रशासनाची विशेष मोहीम - जिल्हाधिकारी किशन जावळे

● रायगड, विशाल पाटील :





जिल्ह्यात सर्पदंश सगळीकडे होत असतात, यामध्ये विंचूदंश हे विशेष असून डॉक्टरांनी सर्पदंश व विंचू दंश झालेल्या रुग्णांना उत्तम सेवा देवून त्यांची काळजी घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.तसेच सर्प व विंचू दंशाने होणारे मृत्यू शून्यावर आणण्यासाठी प्रशासनाची विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक कॉन्फरन्स हॉल येथे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

या कार्यशाळेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाट, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अंबादास देवमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे, पद्मभूषण डॉ.हिम्मतराव बावस्कर आदि उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, रायगड जिल्हा जंगळमय असून समुद्र तटी आहे. त्यातच जिल्ह्यात पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे सरपटणारे प्राणी याकाळात बाहेर येवून मानवीवस्तीत येत असतात. त्यामुळे सर्पदंश व विंचूदंशाचे प्रमाण वाढत आहे. याकरिता वेगळया दिशेने संशोधन करणे गरजेचे आहे. शासनाकडून वैद्यकीय सेवेकरिता डॉक्टर घडावेत याकरिता मोठ्या प्रमाणावर खर्च केला जात आहे. यासाठी डॉक्टरांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग जनसेवेसाठी करावा, अशा सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या. पावसाळयात काम करणाऱ्यांना मजूरांना मोठे गमबूट देण्यात यावेत याकरिता विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. आपण शिकलो, शासकीय नोकरीत आहोत, आपल्याला जनतेला वैद्यकीय सेवा द्यायची आहे अशी मनभावना प्रत्येक डॉक्टराची असली पाहिजे. डॉक्टरांनी सदैव अद्ययावत, सकारात्मक काम करावे. प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या डॉक्टरांनी आपल्या मुख्यालयात राहावे, असे निर्देशही त्यांनी कार्यशाळेला उपस्थित असलेल्या डॉक्टरांना दिले. पद्मभूषण डॉ.हिम्मतराव बावस्कर यांनी मोठे पुण्याचे काम केले असून त्यांनी सर्पदंश व विंचू दंशावर केलेल्या औषधांचा वापर संपूर्ण कोकणात केला जात असून याबद्दल जिल्हाधिकारी श्री.जावळे त्यांचे विशेष आभार मानले. अतिजोखमीच्या गरोदर माता यांचे निदान व उपचार करुन त्यांची काळजी घेणे देशासाठी महत्वाचे आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाट म्हणाले की, पद्मभूषण डॉ. हिम्मतराव बावस्कर यांनी जिल्ह्यात अनेक प्रकारच्या विंचूदंशावर उपचार करुन नागरिकांना जीवदान दिले असल्यामुळे त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना शासनाकडून पद्मभूषण ही पदवी देण्यात आली असून ती कौतुकास्पद आहे. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या डॉक्टरांनी मुख्यालयात राहून जनसेवा करावी, अशा सूचना त्यांनी यावेळी संबंधितांना दिल्या. सीएसआर फंडातून एक्सरे मशीन घेण्यात आली असल्यामुळे रुग्णांना एक्सरे काढण्यासाठी इतरत्र जाण्याची आवश्यकता भासणार नाही. तसेच जिल्हा वार्षिक योजनेमधून आणखी एक एक्सरे मशीन घेण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. शासनाकडून वैद्यकीय सेवेकरिता मोठ्याप्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जात असून त्याचे योग्य ते नियोजन झाले पाहिजे. डॉक्टरांनी आपल्या कार्यक्षेत्रात हजर राहून रुग्णांना उत्तम सेवा देवून चांगले काम करावे.

# नंदुरबारमध्ये चार मालमोटारी आणि बसचा अपघात



● नंदुरबार , सचिन कदम :

नवापूर तालुक्यातील कोंडाईबारी घाटात मंगळवारी दुपारी चार मालमोटारी आणि बस अशा पाच वाहनांचा अपघात होऊन दोन मालमोटार चालक त्यांच्या कक्षातच अडकले असून एकाचा मृत्यू झाला आहे. गुजरात राज्यातील सुरत-अमळनेर बसमधील १० पेक्षा अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना विसरवाडी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

कोंडाईबारी घाटात एक मालमोटार आणि दोन तेल टँकरचा अपघात झाला होता. तेलाचे टँकर रस्त्यावर उलटल्यामुळे संपूर्ण तेल महामार्गावर पडल्याने अनेक वाहने घसरून अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. राष्ट्रीय महामार्ग पोलीस मदत केंद्राचे कार्यालय जवळच आहे. संबंधित विभाग आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी ठोस उपाययोजना न केल्याने हा अपघात झाल्याचे सांगितले जाते. घाटात चार मालमोटारींच्या विचित्र अपघातामुळे वाहनांचे आणि मुद्देमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

मालमोटार चालक, सहचालक त्यांच्या कक्षातच अडकले असून त्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न होत आहेत. गुजरातची बस अपघातग्रस्त झाल्याने जखमी प्रवाशांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. कोंडाईबारी घाटातील अपघातामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

# सरस्वती शाळेच्या बसचा भीषण अपघात, एक विद्यार्थी ठार

● नागपूर, सचिन कदम :



उपराजधानीतील शंकरनगरमधील सरस्वती माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी सहलीला जात असतांना बस चालकाचे नियंत्रण सुटून बस हिंगणा परिसरात उलटली. या अपघातात एका विद्यार्थीनीचा मृत्यू, तर अनेक विद्यार्थी जखमी झाले. सर्व जखमींवर नागपुरातील एम्स रुग्णालयात उपचार सुरू केले आहे. जखमी झालेल्या एका विद्यार्थ्याला शस्त्रक्रियेसाठी नेण्यात आले आहे.

एम्स प्रशासनाच्या माहितीनुसार, हिंगणा परिसरात घडलेल्या अपघातानंतर सुमारे ४८ विद्यार्थ्यांना तातडीने एम्समध्ये हलवण्यात आले. तेथील आपत्कालीन विभागात दोन वार्ड या विद्यार्थ्यांसाठी तडका- फडकी उघडून सर्व तपासणीची सोय करण्यात आली. येथे तातडीने शस्त्रक्रिया, औषधशास्त्र, क्ष-किरणशास्त्रसह सगळ्याच विभागातील डॉक्टरांना पाचारन करून झटपट तपासणी सुरू केली गेली. त्यात एका विद्यार्थीनीचा आधीच मृत्यू झाल्याचे पुढे आले.

वैद्यकीय तपासणीत आणखी एका विद्यार्थ्याच्या पोटाला गंभीर इजा झाल्याचे पुढे आले. त्याला तातडीने शस्त्रक्रियेसाठी शल्यक्रियागृहात हलवण्यात आले तर इतर रुग्णांचीही तातडीने त्रास बघत तपासणीचे काम सुरू आहे. दरम्यान येथील सर्व विद्यार्थ्यांना मानसिक धक्का बसल्याने येथे मानसोपचार तज्ज्ञांचीही चमू तैनात करण्यात आली आहे. या चमूकडून मुलांचे समूपदेशन केले जात आहे. दरम्यान विद्यार्थ्यांच्या पालकांसह नातेवाईकांना माहिती मिळाल्यावर त्यांनीही एम्समध्ये गर्दी केली आहे. त्यांना एम्स प्रशासन, शालेय प्रशासनासह पोलिसांकडून समजावण्याचे प्रयत्न सुरू आहे. हे सर्व विद्यार्थी सातवी ते दहावी वर्गातील असल्याची माहिती एम्स प्रशासनाकडून दिली गेली.

नागपुरातील शंकरनगर येथील सरस्वती माध्यमिक विद्यालयाची शाळेची बस हिंगणा परिसरातून पर्यटनाला जात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला. बस रस्त्याच्या बाजूला असलेल्या खड्ड्यात खाली कोसळली. या विचित्र अपघातात एक विद्यार्थीनी ठार झाली. तर बसमधील अनेक विद्यार्थी जखमी झाले. तातडीने या सगळ्याच विद्यार्थ्यांना उपचारासाठी एम्स रुग्णालयात हलवण्यात आले. या विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहे.

## ट्रॅव्हल्सच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह

■ सरस्वती शाळेकडून विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक सहलीसाठी खासगी ट्रॅव्हल्सची नोंदणी केली गेली होती. त्यानुसार विद्यार्थी व शिक्षक बसने निघाले. परंतु हिंगणाजवळ अपघात झाल्याने या खासगी बसेसच्या दर्जासह शाळेकडून खासगी बसेसची निवड कशी केली जाते? हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### एसटी बसेसला प्राधान्य का नाही?

■ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडूनही (एसटी) बसेस शैक्षणिक सहलीसाठी उपलब्ध केल्या जातात. या बसेसमध्ये गर्ती मर्यादा, प्रशिक्षणीत चालक- वाहकासह इतरही नियमांचे तंतोतंत पालन केले जाते. त्यानंतरही शाळांकडून या बसेसला प्राधान्य का दिले जात नाही? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

# नांदगाव विद्यालयात अमृत महोत्सवी संविधान दिन साजरा



● रायगड, विशाल कारंडे:

सुधागड तालुक्यातील संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथे मंगळवार (ता.२६) संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सर्वांनी मिळून संविधान उद्देशिकेचे वाचन केले. संविधान दिनानिमित्त सोनल ठकोरे ,महेंद्र जाधव,अशोक शिंदे यांनी संविधानाची महत्वाची कलमे, नागरिकांचे मुलभूत हक्क व कर्तव्य यांची सखोल माहिती दिली. तसेच मुळात संविधानाची गरज का आहे या बाबत सविस्तर विवेचन केले. आणि संविधान विषयी सखोल माहिती देवून जनजागृती केली.

# ‘अदानी’मधील गुंतवणूक फ्रान्सच्या कंपनीने थांबवली

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :




अदानी समूहाचे संस्थापक-अध्यक्ष गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेच्या न्याय मंत्रालयाने ठेवलेल्या लाचखोरीच्या आरोपांनंतर त्यांचे गुंतवणूकदार सावध झाले आहेत. हे आरोप निकाली निघत नाहीत तोपर्यंत अदानी समूहाच्या कंपन्यांमध्ये नव्याने गुंतवणूक न करण्याचा निर्णय फ्रान्सच्या ‘टोटलएनर्जीज एसई’ या ऊर्जा क्षेत्रातील बलाढ्य कंपनीने सोमवारी जाहीर केला.

‘टोटलएनर्जीज’ ही अदानी समूहाच्या सर्वात मोठ्या परदेशी गुंतवणूकदारांपैकी एक कंपनी आहे. अदानी समूहाच्या अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील ‘अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड’ (एजीईएल) आणि ‘अदानी टोटल गॅस लिमिटेड’ (एटीजीएल) या कंपन्यांमध्ये त्यांनी गुंतवणूक केलेली आहे. मात्र, गुंतवणूक करताना आपल्याला कथित भ्रष्टाचाराच्या तपासाची कल्पना नव्हती असे या कंपनीने स्पष्ट केले आहे.

‘टोटलएनर्जीज’कडून सोमवारी एक निवेदन प्रसृत करण्यात आले. गौतम अदानी आणि त्यांच्या अन्य दोन कार्यकारी अधिकाऱ्यांनी २६५ दशलक्ष डॉलरची कथित लाच दिल्याचे आम्हाला समजले असे त्यात नमूद केले आहे. ‘‘या आरोपांमध्ये ‘एजीईएल’ किंवा ‘एजीईएल’शी संबंधित कंपन्यांचे नाव नाही. अदानी समूहातील व्यक्तींविरोधातील आरोप निकाली लागत नाहीत तोपर्यंत ‘टोटलएनर्जीज’ अदानी समूहामध्ये कोणतीही नवीन गुंतवणूक करणार नाही’’ असे कंपनीकडून सांगण्यात आले.

‘एजीईएल’मध्ये ‘टोटलएनर्जीज’चे १९.७५ टक्के समभाग आहेत. त्याशिवाय ‘एजीईएल’च्या सौर व पवनऊर्जा निर्मिती करणाऱ्या तीन सहकंपन्यांमध्ये त्यांची ५० टक्के गुंतवणूक आहे. तसेच, ‘टोटलएनर्जीज’चे ‘एजीईएल’मध्ये ३७.४ टक्के समभाग आहेत.

# आमदार शिवाजी पाटील यांचा भाजपला पाठिंबा

● कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :



चंदगड विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेले अपक्ष आमदार शिवाजी पाटील यांनी सोमवारी भाजपला पाठिंबा दिला आहे. आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे त्यांनी पाठिंब्याचे पत्र सादर केले.चंदगड मतदारसंघात अजित पवार गटाचे आमदार राजेश पाटील यांच्या विरोधात भाजपचे असलेले शिवाजी पाटील यांची दुसऱ्यांदा निवडणूक झाली. गेल्यावेळी दुसऱ्या स्थानी राहिलेले अपक्ष उमेदवार शिवाजी पाटील यांनी राजेश पाटील यांच्या पराभवाची परतफेड तब्बल २४ हजाराच्या मताधिक्याने केली होती. काल जिल्ह्यातील महायुतीचे आमदार विशेष विमानाने मुंबईला गेले होते. यानंतर आमदार पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन भाजपला पाठिंबा असल्याचे पत्र सादर केले. फडणवीस यांनी विजयाबद्दल आमदार पाटील यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. पाठिंबा दिल्याबद्दल आभार मानले. विधानसभा निवडणुकीपूर्वी शिवाजी पाटील यांनी मुंबईत आयोजित केलेल्या दहीहंडी समारंभात फडणवीस यांनी त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या होत्या.

# तब्बल ९ महिन्यांनी नवी मुंबई परिवहन बस सेवा सुरु

● नागपूर, दिगंबर जाधव :

फेब्रुवारी महिन्यामध्ये उरण तालुक्यातील खोपटे येथे झालेल्या भीषण अपघातानंतर नवी मुंबईसाठी प्रवासाची जीवनरेखा ठरलेली 'एनएमएमटी'ची बससेवा नवी मुंबई परिवहन बस सेवेच्या व्यवस्थापनाने कामगारांची सुरक्षा आणि तोट्यात चालणारा मार्ग ठरवून अनिश्चित काळासाठी उरण मध्ये एनएमएमटीची सेवा बंद केली होती . याचा फटका उरणच्या प्रवाशांना बसला.यामध्ये विशेषतः जेष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी आणि कामगार यांच्यासह सर्वसामान्य नागरिकांनाही त्रास सहन करावा लागत होता . त्यामुळे उरणकर प्रवाशांना आपले निश्चित ठिकाण गाठण्यासाठी धोकादायक खाजगी वाहतुकीचा आसरा घ्यावा लागला होता यामुळे वेळ आणि अधिकच्या खर्चाचा भार उरणकरांच्या खिशावर पडत होता.मात्र बुधवार दिनांक २७ नोव्हेंबर २०२४ पासून उरण तालुक्यात एनएमएमटी ची बस सेवा सुरु होणार असल्याची माहिती नवी मुंबई परिवहन बस सेवेचे व्यवस्थापक योगेश कडूस्कर यांनी दिली. त्यामुळे जनतेत आनंदाचे वातावरण पसरले आहे.

उरण ते कोपरखैरणे, जुईनगर रेल्वे स्थानक, कळंबोली दरम्यानच्या ३०,३१ आणि ३४ या क्रमांकाच्या मार्गावरील 'एनएमएमटी'ची बससेवा परिवहन उपक्रमाकडून पूर्णपणे बंद करण्यात आली होती . या व्यवस्थेला पर्याय म्हणून प्रवाशी वर्गांनी रेल्वेला पसंती दिली होती मात्र उरण ते बेलापूर, नेरुळ मार्गावर उरण रेल्वे स्थानकातून एका तासाने लोकल सुटत आहेत. त्यामुळे नवी मुंबई, मुंबईच्या दिशेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना तासभर लोकलची वाट पहावी लागत होती . शिवाय उरण शहरातून रेल्वे स्थानक गाठण्यासाठी प्रवाशांना रिक्षाचे अधिकचे भाडे मोजावे लागत होते . या समस्येमुळे शहरातून आणि तालुक्यातील गावाजवळून जाणाऱ्या 'एनएमएमटी'मुळे प्रवास करणे अधिक सोयीचा होता. मात्र, बससेवा बंद झाल्याने नागरिकांना अनेक संकटांचा सामना करीत प्रवास करावा लागत होता . त्यामुळे 'एनएमएमटी'ची



बससेवा लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी उरणकर नागरिकांकडून केली जात होती.मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, काँग्रेस पक्ष,जनवादी महिला संघटना, उरण सामाजिक संस्था, जेष्ठ नागरिक संस्था, मॉर्निंग कट्टा ग्रुप यांच्यासह विविध सामाजिक संस्था, संघटना यांनीही एनएमएमटी सुरु करण्याबाबत पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता. त्याला आता यश आले आहे.

अनेक वर्षांपासून उरण तालुक्यात सुरु असलेली एनएमएमटी बससेवा दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ पासून अचानक बंद करण्यात आली होती.सदरची बससेवा तात्काळ सुरु करण्याची मागणी उरण तालुक्यातील विविध सामाजिक संस्था, संघटनानी एनएमएमटी प्रशासनाकडे केली होती.नवीमुंबई महानगर पालिकेच्या परिवहन विभागाच्या वतीने उरण ते नवी मुंबई मार्गावर बस सेवा सुरु होती. जुईनगर ते उरण शहरासह तालुक्यातील कोप्रोली, वशेणी व पिरकोन या मार्गावर चालणाऱ्या ३०, ३१ व ३४ क्रमांक असलेल्या एनएमएमटी बस दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ पासून अचानकपणे बंद करण्यात आल्या होत्या . त्यामुळे उरण तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते .

एनएमएमटी बंद झाल्याने व्यवसाय, नोकरी, धंदा, कार्यालयीन व दैनंदिन कामासाठी मुंबई, ठाणे, नवीमुंबईकडे जाणाऱ्या हजारो प्रवाशांचे हाल होत आहेत. त्याच प्रमाणे आर्थिक नुकसान देखील होत आहे. याशिवाय दहावी, बारावी तसेच विविध कोर्स तसेच उच्च शिक्षण घेण्यासाठी उरण तालुक्यातील विद्यार्थी मुंबई, नवी मुंबई मध्ये शिकण्यासाठी मोठया प्रमाणात जात असतात. या सर्वांसाठी एनएनएमटी बसने प्रवास करणे सुरक्षित एकमेव व उत्तम पर्याय होते.

# आंबा काजु पिक विमा भरण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ

● तळा, भावना जैन:



आंबा काजु पिक विमा भरण्यासाठी शेतकरयांची धावपळ दिसून येत असून तलाठी कार्यालय तसेच बँकेत गर्दी दिसून येत आहे. या वर्षी तालुक्यातील खरीप व रब्बी हंगामात पिक पहाणी हे काम शेतकरयांनी करावे असे होते. तदनंतर सहाय्यक व त्यानंतर महसूल कर्मचारी अशी नेमणूक करण्यात आली आहे. तरी या भागात नेटवर्क प्रॉब्लेम काही ठिकाणी नकाशे न जुळणे तर अनेक. वयोवृद्ध शेतकरीबांधवाकडे मोबाईल नसणे अशा संकटाना सामोरे जावे लागेल. यामुळे शेतकर्यांच्या सातबारा वर पिक पेराराबविण्यात अडचणी निर्माण झाल्या त्यातून ज्याच्यां नोंदणी झाल्या अशा लोकांना बॅक दरबारी फेरया माराव्यालागत आहेत.

गेल्या वर्षी आंबा उत्पादक शेतकरी बांधवांनी केलेल्या उपोषणाला यश मिळुन आंबा पिक विमा हेक्टरी ३९००० रुपयांवरून १४५०० रुपयावर आला आहे. त्यामुळे पिक विमा कंपनी कडुन शासनाने दिलासा मिळवून दिला असल्याचे दिसून येत आहे. यावर्षी पिक विमा उतरण्यासाठी आंबा काजु पिक विमा पिक पेरा न जमल्यानेआंबा काजु पिक विमा भरण्यासाठी शेतकरयांची कुचंबना दिसून येत आहे.